सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
पशुसंवर्धन विभाग

डिजीटल ई-मासिक

# महापशुधन वार्ता

वर्ष २ रे अंक पाचवा, माहे – सप्टेंबर, २०२६







डिजीटल ई-मासिक

# महापशुधन वार्ता

वर्ष १ ले, अंक १२ वा,  एप्रिल-२०२६

मुख्य संपादक

**डॉ. देवेंद्र गीता सुरेश जाधव**

सहआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय
(पशुधन व नियोजन) पशुसंवर्धन आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे-411067

सहसंपादक

**डॉ. प्रशांत प्रमिला दयाराम भड**

उपआयुक्त पशुसंवर्धन, तथा सदस्य सचिव
महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरण,
पशुसंवर्धन आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, औंध,
पुणे-411067

वृत्तसंपादक

**श्री. संतोष ताराबाई शिवराम पवार,**

प.प.'महापशुधन वार्ता' कक्ष तथा,
जनसंपर्क अधिकारी, पशुसंवर्धन आयुक्तालय,
औंध, पुणे-67




मागील अंक वाचण्यासाठी

dahd.maharashtra.gov.in /अथवा स्कॅन करा

**पत्रव्यवहारासाठी पत्ता :**

**मुख्य संपादक**

महापशुधन वार्ता कक्ष
पसं-१३, पशुसंवर्धन आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य,
औंध, पुणे - ४११०६७

Email: mahapshudhanvarta@gmail.com

या अंकातील लेखांमध्ये व्यक्त करण्यात आलेल्या मतांशी संपादक व पशुसंवर्धन विभाग सहमत असेलच, असे नाही ( पुणे न्यायकक्षेत ).

## या अंकात...


- परळी वैजनाथ: पशुवैद्यकीय महाविद्यालय उद्घाटन
- पशुधन विमा योजनेसाठी अर्ज मागविण्यास सुरुवात
- कोल्हापुर: पशुवैद्यकीय महाविद्यालयाचे भव्य उद्घाटन
- मा. सचिव महोदयांच्या हस्ते एफएमडी मोहिमेस प्रारंभ
- महाराष्ट्राचा पशुवैभवाचा राष्ट्रीय स्तरावर दुहेरी सन्मान
- छ. संभाजीनगर: मा. सचिव महोदयांकडून 'जीएफएसएस'ची पाहणी
- मा. आयुक्त पशुसंवर्धन यांचा कोल्हापुर दौरा
- पशुसंवर्धन आयुक्तालया स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा
- पुणे: मा.आयुक्त महोद्यांच्या हस्ते एफएमडी लसीकरणास सुरुवात
- अहिल्यानगर: सहआयुक्त (मुख्यालय) यांचेकडून पाहणी
- महाराष्ट्राच्या दुग्धव्यवसायाची नवी श्वेतक्रांती: मा. आयुक्त
- पशुसंवर्धनओळख माडग्याळ जातीच्या मेंढीची
- लाळखुरकत रोग नियंत्रण व सेरो-मॉनिटरींग फेरी -9
- पावसाळ्यात वन हेल्थ दृष्टीकोन
- पशुपालक ते उद्योजक (भाग-2): एमबीएचा सापळा
- अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांना बोकड वाटप
- अहिल्यानगर जिल्ह्यात एफएमडी लसीकरण मोहीमेला वेग
- गोजातीय प्रजनन क्षेत्रातील उत्कृष्टतेचा होणार गौरव
- जळगाव: एफएमडी फेरीची राज्यस्तरीय पथकाकडून तपासणी
- अमरावती: तांत्रिक कार्य व व्हीएमडीडीपी आढावा बैठक
- उमरी येथे पशुपालक प्रशिक्षण कार्यक्रम उत्साहात
- हिंगोली येथे आधुनिक शेळीपालन व कुक्कुट व्यवस्थापन प्रशिक्षण
- नागपूर: कॅल्क्युलेटेड एआय उपक्रमाचा शुभारंभ
- अमरावती: वंध्यत्व निवारण व पशुचिकित्सा शिबिर संपन्न
- यशकथा: पोल्ट्री व्यवसायाची वेगळी वाट व यशस्वी वाटचाल
- युटेराईन टॉर्शनवर यशस्वी उपचार
- वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून प्रक्षेत्रांची पाहणी
- अलिबागमध्ये शेळीवर यशस्वी सिझेरियन शस्त्रक्रिया
- सुकळी येथे एकदिवसीय महिला पशुसंवर्धन विषयक कार्यशाळा
- पशुसंवर्धनविषयक प्रशिक्षण: ग्रामस्थ बनताहेत उद्योजक
- सुलभ प्रसुतीची बाराखडी





**मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना**

**राज्यस्तरीय योजना** | **जिल्हास्तरीय योजना**

**पशुवैद्यकीय सेवेसाठी डायल करा 1962**

**व्हॉटस् अप चॅटबॉट**

**9063142299**

व्हॉट्स अप चॅटबॉट



# परळी वैजनाथ येथे पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालयाचे भूमिपूजन

## मराठवाड्याच्या प्रगतीची नवी पायाभरणी - उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

बीड: परळी वैजनाथ येथे 634 कोटी रुपये खर्चाच्या पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालयाचा कोनशिला समारंभ आणि भूमिपूजन सोहळा राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा बीडच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाला. या प्रकल्पामुळे मराठवाड्यातील विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे पशुवैद्यकीय शिक्षण मिळण्यासोबतच स्थानिक शेतकऱ्यांच्या समृद्धीला नवीन दिशा मिळणार आहे, असा विश्वास यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी व्यक्त केला.

या ऐतिहासिक सोहळ्याला राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, आमदार धनंजय मुंडे, आमदार नमिता मुंदडा यांच्यासह प्रशासकीय वर्गातील पशुसंवर्धन विभागाचे सचिव डॉ. एन. रामास्वामी, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जतीन रहेमान आणि पोलीस अधीक्षक नवनीत कावत आदी मान्यवर उपस्थित होते.

(उर्वरीत वृत्त पुढील पृष्ठावर...)




## पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालयाची वैशिष्ट्ये व थेट फायदे:

- 634 कोटींच्या निधीतून सुसज्ज इमारत, वसतिगृह, अत्याधुनिक प्रयोगशाळा व जागतिक दर्जाचे संशोधन केंद्र उभारले जाणार आहे.
- परळी व परिसरातील 50 ते 100 गावांतील जनावरांवर सर्व प्रकारचे आधुनिक उपचार याच केंद्रात होतील.
- दूध उत्पादन वाढवणे आणि शेळीपालनाला अधिक फायदेशीर बनवण्यासाठी येथे विशेष संशोधन केले जाईल.
- चालू शैक्षणिक वर्षातच विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया सुरू केली जाणार आहे.

### नोकरी मागणारे नव्हे, नोकरी देणारे उद्योजक घडणार

उपमुख्यमंत्र्यांनी नमूद केले की, या महाविद्यालयातून केवळ पदवीधर डॉक्टरच बाहेर पडणार नाहीत, तर पेट केअर क्लिनिक, डेअरी सल्लागार आणि पशुखाद्य निर्मितीच्या माध्यमातून हजारो तरुणांना नोकरी देणारे 'पशू उद्योजक' निर्माण होतील. “समृद्ध शेतकरी, सुदृढ जनावर आणि स्वावलंबी मराठवाडा” घडवण्याचा संकल्प या प्रसंगी व्यक्त करण्यात आला.



परळी वैजनाथ येथे 634 कोटी रूपयांच्या अवाढव्य खर्चातून उभारले जाणारे 'पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय' केवळ एक शैक्षणिक संस्था नसून, तो मराठवाड्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कायापालट करणारा महत्त्वाकांक्षी प्रकल्प ठरणार आहे. त्यामुळे या महाविद्यालयाचे काम अत्यंत दर्जेदार आणि वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश यंत्रणेला देण्यात आले आहेत. तसेच “समृद्ध शेतकरी, सुदृढ जनावर आणि स्वावलंबी मराठवाडा” घडवण्याचा संकल्प करण्यात आला असल्याचे उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यांनी यावेळी सांगितले.












प्रकाशक: पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य



# 'पशुधन विमा योजना'साठी अर्ज मागविण्यास सुरुवात!

## शेतकरी-पशुपालकांनी लाभ घ्यावा; पशुसंवर्धन विभागाचे आवाहन

पशुसंवर्धन आयुक्तालय, पुणे-67

राज्यभरातील पशुपालकांच्या पशुधनाला विविध आजार, अपघात व नैसर्गिक आपत्तींपासून संरक्षण देण्यासाठी केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय पशुधन अभियानांतर्गत (NLM) 'पशुधन विमा योजना' राबवण्यास शासनाने मान्यता दिली आहे. या योजनेसाठी शेतकरी-पशुपालक बांधवांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्याची प्रक्रिया सुरू झाली असून दि. 25 ऑगस्ट 2026 रोजी 'ॲग्रीकल्चर इन्श्युरन्स कंपनी ऑफ इंडिया लि.' (AIC) या कंपनीसोबत पशुसंवर्धन विभागाने सामंजस्य करार (MoU) केल्याची माहिती मा. आयुक्त पशुसंवर्धन महाराष्ट्र राज्य डॉ. किरण पाटिल (भा.प्र.से.) यांनी दिली.

पशुधन विमा योजनेमुळे पूर, वीज पडणे, अपघात आणि विषबाधा, तसेच पशुधनाचा अनैसर्गिक मृत्यू झाल्यास पशुधन गमावणाऱ्या पात्र पशुपालक / शेतकऱ्यांना मोठा आर्थिक दिलासा मिळणार आहे. या योजनेअंतर्गत विमा हप्त्याची 85% रक्कम केंद्र व राज्य शासन (60:40 प्रमाणात) भरणार असून, लाभार्थी पशुपालकाला केवळ 15% हिस्सा द्यावा लागेल. राज्यभरात या योजनेच्या अंमलबजावणीसाठी निविदा प्रक्रियेद्वारे 'ॲग्रीकल्चर इन्श्युरन्स कंपनी ऑफ इंडिया लि.' (AIC) ची निवड करण्यात आली आहे. विमा प्रीमियमचे दर 1 वर्षासाठी 4.30%, 2 वर्षांसाठी 7.50% आणि 3 वर्षांसाठी 10.50% असे निश्चित करण्यात आले आहेत.

### विमा संरक्षणाची मर्यादा व निकष:

- एका कुटुंबातील **कमाल 10 पशुधनासाठी** अनुदानाचा लाभ मिळेल.
- **दुभती गाय:** कमाल मूल्य ₹70,000/- पर्यंत संरक्षण.
- **दुभती म्हैस:** कमाल मूल्य ₹80,000/- पर्यंत संरक्षण.
- **बैल / रेडे:** अनुक्रमे ₹70,000/- आणि ₹80,000/- पर्यंत संरक्षण.
- **शेळी व मेंढी:** कमाल मूल्य ₹7,000/- प्रति जनावर.

### पारदर्शकता व तंत्रज्ञानाचा वापर:

- विम्यासाठी पशुधनाची नोंद **'भारत पशुधन प्रणाली' (NDLM)** वर 12 अंकी कानातील बिल्ल्यासह (Ear Tag / UID) असणे बंधनकारक.
- विमा कंपनी UID सोबतच **RFID तंत्रज्ञानाचा** वापर करू शकेल.
- **"नो टॅग, नो क्लेम"** या नियमाचे कडक पालन केले जाईल.

### 15 दिवसांत क्लेम थेट खात्यात (DBT):

जनावराचा मृत्यू झाल्यास 24 तासांच्या आत विमा कंपनीला नोंदणीकृत संपर्क माध्यमाद्वारे कळवणे आवश्यक आहे. आवश्यक कागदपत्रे व पोस्ट-मॉर्टम अहवाल सादर केल्यानंतर **15 दिवसांच्या आत विम्याची रक्कम थेट शेतकऱ्याच्या बँक खात्यात (DBT)** जमा केली जाईल. पात्र विमा क्लेमची मुदतीत भरपाई न दिल्यास विमा कंपनीला **12% दराने व्याज** द्यावे लागेल. राज्यात या योजनेची अंमलबजावणी **'महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ (MLDB), नागपूर'** मार्फत केली जाणार असून राज्यस्तरावर पशुसंवर्धन आयुक्त या योजनेचे सनियंत्रण करतील, अशी माहिती मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. शितलकुमार मुकणे यांनी दिली आहे.




| कालावधी | निविदा प्रिमियम दर (%) | एकूण विमा हप्ता (रु.) | पशुपालकाचा हिस्सा (१५%) (रुपये) |
|---|---|---|---|
| १ वर्ष | ४.३०% | रु. ३,०१० | रु. ४५१.५० |
| २ वर्षे | ७.५०% | रु. ५,२५० | रु. ७८७.५० |
| ३ वर्षे | १०.५०% | रु. ७,३५० | रु. १,१०२.५० |




पशुपालकांसाठी विविध विमा योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने पशुसंवर्धन विभाग आणि 'ॲग्रीकल्चर इन्श्युरन्स कंपनी ऑफ इंडिया लि.' (AIC) यांच्यात नुकताच महत्त्वपूर्ण सामंजस्य करार (MoU) संपन्न झाला. या प्रसंगी पशुसंवर्धन आयुक्त मा. डॉ. किरण पाटील (भा.प्र.से.) उपस्थित होते. त्यांच्यासोबत अतिरिक्त पशुसंवर्धन आयुक्त डॉ. शितलकुमार मुकणे, सहआयुक्त डॉ. देवेंद्र जाधव, सांख्यिकी सहसंचालक श्रीमती शिल्पा पांडे तसेच उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय डॉ. प्रशांत भड, पविअ डॉ. श्रीमती काळे आणि AIC कंपनीचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या करारामुळे राज्यातील पशुपालकांना अधिक सुरक्षितता मिळून पशुपालन क्षेत्राला मोठा दिलासा मिळणार आहे.










**योजनेच्या शासन निर्णयासाठी क्युआर कोड स्कॅन करा.**

**पोर्टल डाऊनलोड करण्यासाठी क्युआर कोड स्कॅन करा**



**प्रकाशक:** पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य

# श्री सिद्धगिरी संस्थान मठ, कणेरी, कोल्हापूर
# पशुवैद्यकीय महाविद्यालय व पशुसर्वचिकित्सालयाचे भव्य उद्घाटन





कोल्हापूर : श्री सिद्धगिरी संस्थाण मठ, कणेरी येथे 'श्री सिद्धगिरी पशुवैद्यकीय महाविद्यालय व पशुसर्वचिकित्सालय' या महत्त्वपूर्ण उपक्रमाचा भव्य उद्घाटन सोहळा पार पडला. राज्याच्या पशुसंवर्धन, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री श्रीमती पंकजा मुंडे या कार्यक्रमाला मुख्य अतिथी म्हणून उपस्थित होत्या. पशुधनाची आरोग्यसेवा अधिक सक्षम करणे व ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असून, मुक्या प्राण्यांच्या सेवेसाठी आणि दर्जेदार पशुवैद्यकीय शिक्षणासाठी हे महाविद्यालय भविष्यात मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास श्रीमती पंकजा मुंडे यांनी व्यक्त केला.

या सोहळ्याप्रसंगी पूज्यश्री काडसिद्धेश्वर स्वामीजी, आमदार अमोल महाडिक, डॉ. नितीन पाटील, डॉ. शिरीष उपाध्ये, डॉ. प्रियाताई महेश शिंदे, डॉ. के. एम. एल. पाठक आणि डॉ. विकास वास्कर यांसारखे अनेक मान्यवर उपस्थित होते. श्री सिद्धगिरी संस्थानाने सुरू केलेल्या या लोककल्याणकारी कार्याचे मनापासून कौतुक करत, श्रीमती पंकजा मुंडे यांनी या नवीन संस्थेला व उपक्रमाला आपल्या उज्वल भविष्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.









# मा. सचिव (पदुम) डॉ. रामास्वामी एन. (भा.प्र.से.) यांच्या हस्ते लाळखुरकूत प्रतिबंधक लसीकरण मोहीम – ९ ला प्रारंभ




छत्रपती संभाजीनगर: लाळखुरकूत या घातक विषाणूजन्य रोगापासून राज्यातील पशूधनाचे रक्षण करण्यासाठी पशुसंवर्धन विभागातर्फे 'लाळखुरकूत (एफएमडी) लसीकरण मोहीम फेरी-9' चे आयोजन करण्यात आले आहे. पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाचे मा. सचिव डॉ. रामास्वामी एन. (भा.प्र.से.) यांच्या शुभहस्ते या लसीकरण मोहिमेचे औपचारिक उद्घाटन झाले. यावेळी महाराष्ट्र पशुधन विकास मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन डॉ. शितलकुमार मुकणे, छत्रपती संभाजीनगर विभागाचे प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन डॉ. भुवनेश बोरकर, जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय डॉ. नानासाहेब कदम, पशुवैद्यकीय अधिकारी व पशुपालक उपस्थित होते.

या प्रसंगी बोलताना मा. सचिवांनी पशुधनाचे आरोग्य उत्तम राखण्यासाठी लाळखुरकत लसीकरण अत्यंत आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. ही लस मोफत उपलब्ध करून दिली जात असून, सर्व पशुपालकांनी आपल्या गायी, म्हशींना वेळेत लस देऊन मोहिमेचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. या मोहिमेमुळे दुग्धव्यवसायाला स्थिरता मिळेल व पशुपालकांचे आर्थिक नुकसान टळेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला. संपूर्ण जिल्ह्यात हे लसीकरण वेगाने आणि प्रभावीपणे पूर्ण करण्यासाठी विशेष पथके तैनात करण्यात आली आहेत.

परिणामकारक लसीकरण् होण्यासाठी पशुसंवर्धन विभागामार्फत पशुधनाचे जंतनिर्मुलन करण्यात येत असून, आवश्यक औषधींचा पुरवठा सर्व संस्थांना करण्यात आला आहे. महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरणाकडे नोंदणीकृत असलेल्या सर्व खाजगी कृत्रिम रेतन तंत्रज्ञांना केंद्र शासनाच्या राष्ट्रीय पशुरोग नियंत्रण कार्यक्रमातंर्गत पशुधनाला एफएमडी लसीकरण करून त्याची नोंद NDLM वर घेतल्यास प्रती पशुधन रु. 5/- प्रमाणे प्रोत्साहनपर अनुदान देण्यात येणार आहे




# पुणे: मा. आयुक्त पशुसंवर्धन यांच्या उपस्थितीत लाळखुरकत रोगप्रतिबंधक लसीकरण



**मुळशी, जि. पुणे:** लाळखुरकूत या घातक विषाणूजन्य रोगापासून राज्यातील पशूधनाचे रक्षण करण्यासाठी पशुसंवर्धन विभागातर्फे 'लाळखुरकूत (एफएमडी) लसीकरण मोहीम फेरी-9' चे आयोजन करण्यात आले आहे. स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून 15 ऑगस्ट 2026 रोजी राज्याचे पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील ( भा.प्र.से.) यांच्या उपस्थितीत मुळशी तालुक्यातील जगदंब रेस्क्यू सेंटर गोशाळा येथे लाळखुरकत लसीकरण फेरीचा शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी गोशाळेतील सर्व पशुधनाला लाळखुरकत प्रतिबंधक लस टोचण्यात आली. तसेच, लस दिल्यानंतर पशुधनाची माहिती 'भारत पशुधन' प्रणालीवर ऑनलाइन नोंदवण्याच्या प्रक्रियेचे प्रात्यक्षिक प्रत्यक्ष दाखवण्यात आले. या कार्यक्रमास पुणे विभागाचे सहआयुक्त डॉ. समीर बोरकर, जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय डॉ. राजेश वासनिक, मुळशी तालुक्याचे सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय डॉ. विश्वास शेरखाने, 1962 या कॉलसेंटर पशुवैद्यकीय सेवेचे संनियंत्रक तथा सहाय्यक आयुक्त डॉ. दत्तात्रय गाडे, रोग नियंत्रण कार्यसनाचे डॉ. भगतसिंग कदम, तसेच जिल्हा पशुवैद्यकीय



सर्वचिकित्सालयाचे डॉ. युवराज रघतवान, डॉ. अमित क्षीरसागर, पशुधन पर्यवेक्षक श्री. भागवत कांबळे, व इतर कर्मचारीरी उपस्थित होते. गोशाळेचे संचालक श्री. योगेश तुपे व त्यांच्या सहकाऱ्यांच्या पुढाकाराने हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला.

"राज्यातील पशुधन रोगांपासून सुरक्षित ठेवणे व पशुपालकांचे आर्थिक नुकसान टाळणे यासाठी 'लाळखुरकत (एफएमडी) लसीकरण मोहीम फेरी-9' अत्यंत महत्त्वाची आहे. राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये 13 ऑगस्टपासून ही मोहीम व्यापक स्वरूपात राबवली जाईल. सर्व पशुपालकांनी आपल्या पशुधनाचे 100% लसीकरण करून घेऊन या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवावा."

मा. डॉ. किरण पाटील* (भा.प्र.से.),
आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य










महाराष्ट्रातील प्रसिद्ध असलेल्या उमरडा या गाईला स्वतंत्र देशी गोवंश म्हणून, तर 'माडग्याळ' प्रजातीच्या मेंढीला राष्ट्रीय स्तरावर स्वतंत्र व अधिकृत प्रजाती (ब्रीड) म्हणून मान्यता मिळाली आहे. राज्यातील उमरडा या स्थानिक गोवंशाचे व माडग्याळ या मेंढी प्रजातीचे संवर्धन, जतन व आनुवंशिक सुधारणा कार्यक्रमांना मोठी चालना मिळणार आहे.महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभागाने राष्ट्रीय पशु आनुवंशिक संसाधन ब्यूरो, करनाल (हरियाणा) या संस्थेला पाठवलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने ही नोंदणी प्रक्रिया पूर्ण झाली आहे. 'भारतीय कृषी संशोधन परिषदेच्या' (आयसीएआर) राष्ट्रीय पशु आनुवंशिक संसाधन ब्यूरो, करनाल (हरियाणा) चे संचालक डॉ. एन. एच. मोहन यांनी याबाबतचे अधिकृत पत्र जारी केले आहे. 7 ऑगस्ट 2026 रोजी पार पडलेल्या 'ICAR ब्रीड रजिस्ट्रेशन कमिटी'च्या 14 व्या बैठकीत या निर्णयावर शिक्कामोर्तब करण्यात आले.





**प्रकाशक:** पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य

उमरडा गोवंशाविषयी....

अमरावती जिल्ह्याचे ब्रिटिशकालीन गॅझेटमधील (1910) नोंदीवरून उमरडा गोवंश गेल्या शतकापासून आपले अस्तित्व राखून असल्याचे सिद्ध होत आहे. बंजारा समाजाव्यतिरिक्त स्थानिक पशुपालकांकडून देखील उमरडा गोवंशाचा सांभाळ केला जात आहे. पश्चिम विदर्भातील यवतमाळ जिल्हा व लगतच्या अमरावती आणि वाशीम जिल्ह्यात अंगकाठीने उंचपुरी, पांढऱ्याशुभ्र रंगाच्या गोधनाचा सांभाळ बंजारा समाजाकडून पारंपरिक पद्धतीने होत असून त्यांना उमरडा गोवंश म्हणून ओळखले जाते.

वाशीम जिल्ह्यातील "उंबर्डा बाजार" या पशुधन बाजारपेठेवरून "उमरडा" हे नाव स्थानिक गोवंशाला प्राप्त झालेले असून यवतमाळ जिल्ह्यातील दिग्रस तालुक्यावरून या गोवंशाला "दिग्रस" किंवा बंजारा समाजावरून "बंजारा गोवंश" म्हणून देखील संबोधले जाते. यवतमाळ जिल्ह्यातील दिग्रस, दारव्हा, आर्णी तालुके, वाशीम जिल्ह्यातील मानोरा, मंगरूळपीर, कारंजा (लाड) हे तालुके आणि अमरावती जिल्ह्यातील नांदगाव खंडेश्वर या तालुक्यात मोठ्या संख्येने उमरडा गोवंश आढळून येतो.



उमरडा गाय



उमरडा बैल





माडग्याळ मेंढी

माडग्याळ मेंढी प्रजातीविषयी...

मुख्यतः धनगर आणि रामोशी समाजातील मेंढपाळ/शेतकरी या मेंढ्या पाळतात. मेंढ्यांचे कळप स्थलांतरित आहेत. विषम हवामानात परिस्थितीशी जुळवून घेण्याची क्षमता, उत्तम रोग प्रतिकारशक्ती, जलद वजन वाढवण्याची क्षमता, कोकरू जगण्याची अधिक क्षमता, मातृत्वाची चांगली प्रवृत्ती आणि चांगला कळप व मटण उत्पादनासाठी फायदेशीर अशा गुणवैशिष्ट्यांमुळे माडग्याळ मेंढ्या दिवसेंदिवस लोकप्रिय होत आहेत.

मेंढपाळांच्या मते माडग्याळ मेंढीची उत्पत्ती सुमारे 100 वर्षांपूर्वी सांगली जिल्ह्यातील माडग्याळ आणि सनमाडी गावात स्थानिक मेंढीपालकांनी निवड पैदास पद्धतीने केली आहे. माडग्याळ मेंढ्या झपाट्याने वजन वाढवण्याची क्षमता दर्शवतात. माडग्याळ ही महाराष्ट्रातील मोठ्या आकाराची आणि मटणासाठी विशेष लोकप्रिय मेंढी आहे. प्रामुख्याने पांढऱ्या रंगावर तपकिरी ठिपके आढळतात तर काही मेंढ्या तपकिरी देखील दिसतात.

पशुसंवर्धन विभागाचे सचिव डॉ. रामास्वामी एन. यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रस्तावाच्या पाठपुरावा आणि संशोधनात पुण्यातील 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र शेळी व मेंढी विकास महामंडळ', महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, नागपूर तसेच कर्नाटक येथील कृषी व पशुवैद्यकीय विद्यापीठातील तज्ज्ञांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले असल्याचे मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन डॉ. शितलकुमार मुकणे यांनी सांगितले.



श्रीमती पंकजा मुंडे
मंत्री, पशुसंवर्धन, पर्यावरण व वातावरणीय बदल, महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई- 400032

### पारंपरिक पशुधनाच्या संवर्धनाला संस्थात्मक व शास्त्रीय बळ

महाराष्ट्राच्या मातीत विकसित झालेल्या उमरडा गाईला स्वतंत्र देशी गोवंश म्हणून व माडग्याळ मेंढीला स्वतंत्र अधिकृत प्रजाती म्हणून मिळालेली राष्ट्रीय मान्यता ही राज्यातील पशुपालकांसाठी अभिमानाची बाब आहे. या मान्यतेमुळे आपल्या पारंपरिक पशुधनाच्या संवर्धनाला संस्थात्मक व शास्त्रीय बळ मिळणार असून, भविष्यात पशुपालकांचे उत्पन्न वाढविण्यासाठीही त्याचा उपयोग होईल. राज्यातील स्थानिक गोवंश व मेंढी प्रजातींचे जतन करतानाच त्यांची उत्पादकता व आनुवंशिक गुणवत्ता सुधारण्यासाठी शासन आवश्यक त्या सर्व उपाययोजना करेल. महाराष्ट्राच्या पशुधनाची ही वैशिष्ट्यपूर्ण ओळख देशाच्या पशुधन क्षेत्रात अधिक ठळकपणे निर्माण करण्याचा आमचा प्रयत्न राहील.



डॉ. रामास्वामी एन. (भा.प्र.से.)
सचिव (पदुम), मंत्रालय, मुंबई-32

### शास्त्रीय पद्धतीने संवर्धन करण्यासाठी आता अधिक व्यापक संधी उपलब्ध

"उमरडा गोवंश आणि माडग्याळ मेंढीला राष्ट्रीय स्तरावर स्वतंत्र अधिकृत ब्रीड म्हणून मिळालेली मान्यता ही महाराष्ट्राच्या पशुधन संपदेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची उपलब्धी आहे. या दोन्ही स्थानिक प्रजातींची वैशिष्ट्ये, आनुवंशिक क्षमता आणि स्थानिक परिस्थितीशी असलेली अनुकूलता यांचे शास्त्रीय पद्धतीने संवर्धन करण्यासाठी आता अधिक व्यापक संधी उपलब्ध झाल्या आहेत. पशुपालक, संशोधक, विद्यापीठे आणि संबंधित संस्थांच्या समन्वयातून या प्रजातींचे जतन, संवर्धन आणि आनुवंशिक सुधारणा यांना अधिक गती देण्यात येईल. महाराष्ट्राच्या स्थानिक पशुधनाला राष्ट्रीय ओळख मिळवून देण्यासाठी विभाग सातत्याने प्रयत्नशील राहील, असे पशुसंवर्धन विभागाचे सचिव डॉ. रामास्वामी एन.यांनी सांगितले.



डॉ. किरण पाटील (भा.प्र.से.)
आयुक्त पशुसंवर्धन,
महाराष्ट्र राज्य, पुणे-67

### स्थानिक पशुपालकांना होणार फायदा

राष्ट्रीय स्तरावर स्वतंत्र ओळख मिळाल्यामुळे आता उमरडा या गोवंशाच्या व माडग्याळ या मेंढी प्रजातीच्या जतन, संवर्धन व सुधारित प्रजननासाठी सरकारी स्तरावर विशेष योजना व निधी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभाग, पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र शेळी व मेंढी विकास महामंडळ, पुणे व महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, नागपूर तसेच संशोधन क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्थांच्या प्रदीर्घ अभ्यास व सातत्यपूर्ण पाठपुराव्याला या निर्णयामुळे मोठे यश मिळाले आहे. या प्रजातींच्या शास्त्रीय जतन, प्रजनन सुधारणा व गुणवत्ता वाढीसाठी केंद्र व राज्य शासनाच्या विशेष योजना राबवणे आता अधिक सोपे होणार आहे. यामुळे स्थानिक पातळीवर पशुपालकांचे उत्पन्न वाढण्यास व ग्रामीण अर्थव्यवस्थेला गती मिळण्यास मोठी मदत होईल.



प्रकाशक: पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य

**छत्रपती संभाजीनगर :** मा. सचिव (पदुम) महोदयांची शासकीय गोठित रेत प्रयोगशाळा (GFSS), छत्रपती संभाजीनगर येथे भेट व पाहणी! पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाचे मा. सचिव डॉ. रामास्वामी एन. (भा.प्र.से.) यांनी छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय गोठित रेत प्रयोगशाळेला भेट देऊन पाहणी केली व तांत्रिक उपक्रमांचा आढावा घेतला. यावेळी त्यांच्या समवेत महाराष्ट्र पशुधन विकास मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन डॉ. शितलकुमार मुकणे, छत्रपती संभाजीनगर विभागाचे प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन डॉ. भुवनेश बोरकर, जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय डॉ. नानासाहेब कदम, पशुवैद्यकीय अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.









# मा. सचिव महोदयांची 'जय भद्रा' ब्रीड मल्टीप्लिकेशन फार्मला भेट



**छत्रपती संभाजीनगर:** जिल्ह्यातील खुलताबाद तालुक्यातील पिंपळगाव खाडे येथील 'जय भद्रा' RGM Breed Multiplication Farm ला पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाचे मा. सचिव डॉ. रामास्वामी एन. (भा.प्र.से.) यांनी भेट देऊन पाहणी केली. यावेळी महाराष्ट्र पशुधन विकास मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन डॉ. शितलकुमार मुकणे, छत्रपती संभाजीनगर विभागाचे प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन डॉ. भुवनेश बोरकर, जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय डॉ. नानासाहेब कदम, पशुवैद्यकीय अधिकारी व पशुपालक उपस्थित होते.






पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळाच्या पडेगाव (छत्रपती संभाजीनगर) येथील प्रक्षेत्रास मा. सचिव (पदु) डॉ. रामास्वामी एन. यांनी भेट देऊन विविध विकासकामांची सविस्तर पाहणी केली. या भेटीदरम्यान त्यांनी गांडूळ खत व अझोला शेड्स, 'स्मार्ट' प्रकल्पांतर्गत चालणारा बोकड जोपासना उपक्रम, लोकर उत्पादनासाठी प्रस्तावित कॉमन फॅसिलिटी सेंटरची जागा व लोकर उत्पादनांच्या विक्री स्टॉल्सची बारकाईने पाहणी करत संपूर्ण कामाचा आढावा घेतला. प्रक्षेत्रातील उत्तम स्वच्छता, सुटसुटीत नियोजन व एकूणच उत्कृष्ट व्यवस्थापन पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले आणि महामंडळाच्या या उल्लेखनीय उपक्रमांचे मनापासून कौतुक केले.






मा. सचिव डॉ. रामास्वामी एन.
पुण्यश्लोक
अहिल्यादेवी मेंढी व शेळी
विकास महामंडळाच्या
पडेगाव प्रक्षेत्राची पाहणी
यांच्याकडून









# वृक्षलागवडीचा आदर्श उपक्रम!

पडेगाव प्रक्षेत्रावर २५ एकरांत २० हजार वृक्षांची यशस्वी लागवड

सचिव महोदयांकडून कौतुक

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मेंढी व शेळी विकास महामंडळाच्या पडेगाव (छत्रपती संभाजीनगर) येथील प्रक्षेत्रावर पर्यावरण संवर्धन आणि जैवविविधतेला प्रोत्साहन देणारा एक स्तुत्य उपक्रम राबवण्यात आला आहे. प्रक्षेत्रातील 25 एकर जागेत महाराष्ट्रातील तब्बल 400 विविध जातींच्या जवळजवळ 20 हजार वृक्षांची यशस्वी लागवड करण्यात आली असून, हे वृक्ष आता 15 ते 20 फूट उंच वाढून हिरवेगार झाले आहेत. या भव्य वृक्षलागवड प्रकल्पाची प्रत्यक्ष पाहणी नुकतीच माननीय सचिव (पदुम) महोदयांनी केली. त्यांनी संपूर्ण प्रक्षेत्राला भेट देऊन झाडांची झालेली वाढ आणि करण्यात आलेल्या देखभालीबद्दल आनंद व्यक्त केला. अत्यंत नियोजनबद्ध रीतीने राबवण्यात आलेल्या या मोहिमेचे त्यांनी मनापासून कौतुक केले. या वृक्षलागवडीमुळे पडेगाव प्रक्षेत्राचा परिसर नयनरम्य बनला असून, हा प्रकल्प इतर शासकीय व निमशासकीय संस्थांसाठी पर्यावरण संरक्षणाचा एक उत्कृष्ट वस्तूपाठ ठरत आहे.














मा. सचिव (पदुम) डॉ. रामास्वामी एन. यांनी पडेगाव येथील मध्यवर्ती कुक्कुटपालन केंद्राला भेट देऊन तेथील पायाभूत सुविधा व सुरू असलेल्या दुरुस्तीच्या कामांची पाहणी केली. यावेळी आगामी शासकीय योजनेतील लाभार्थ्यांना वेळेत पिल्लांचा पुरवठा करता यावा यासाठी मूळ पक्ष्यांचे संगोपन तात्काळ सुरु करण्याचे स्पष्ट निर्देश त्यांनी दिले. तसेच हे केंद्र पूर्ण क्षमतेने व प्रभावीपणे कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक निधी व लागणारी सर्व मदत प्राधान्याने उपलब्ध करून द्यावी, अशी सूचना त्यांनी जिल्हाधिकारी श्री. विनय गौडा (भा.प्र.से.) यांना केली.










# मा. आयुक्त पशुसंवर्धन डॉ. किरण पाटील (भा.प्र.से.) यांचा कोल्हापूर दौरा

**एफएमडी लसीकरण (९ वी फेरी):**
जिल्ह्यातील लाळ्या-खुरकूत (FMD) लसीकरणाच्या नवव्या फेरीच्या नियोजनाचा सविस्तर आढावा घेतला व लसीकरण मोहीम प्रभावीपणे राबवण्याचे निर्देश दिले. तसेच नॅशनल डिजिटल लाइव्हस्टॉक मिशन अंतर्गत पशुधनाच्या नोंदी वेळेत पूर्ण करण्याचे आवाहनही त्यांनी केले.





**•कृत्रिम रेतन कामकाज:**
जिल्ह्यातील कृत्रिम रेतन कार्यक्रमाच्या प्रगतीचा आढावा घेऊन पशुप्रजनन सेवा अधिक गतीमान करण्याबाबत मार्गदर्शन केले.

**•तांत्रिक कामकाज:**
कार्यालयातील इतर तांत्रिक बाबी व प्रशासकीय कामकाजाची पाहणी करून योग्य त्या सुधारणांसाठी सूचना दिल्या.

# महापशुधनवार्ता डिजीटल ई-मासिकाचे प्रकाशन



पशुसंवर्धन विभागामार्फत प्रसिद्ध केल्या जाणाऱ्या 'महापशुधनवार्ता' या डिजीटल ई-मासिकाचे प्रकाशन मा. सचिव (पदुम) डॉ. रामास्वामी एन. (भा.प्र.से.) यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी मा. आयुक्त पशुसंवर्धन डॉ. किरण पाटील (भा.प्र.से.), मा. अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ डॉ. शितलकुमार मुकणे, सहसचिव मा. श्री. निवृत्ती मराळे, सहआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय (पशुधन व नियोजन) डॉ. देवेंद्र जाधव, सहआयुक्त पशुसंवर्धन (मुख्यालय) डॉ. शैलेश केंडे, सहआयुक्त पशुसंवर्धन डॉ. याहयाखान पठाण, उपआयुक्त पशुसंवर्धन तथा सदस्य सचिव, महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य डॉ. प्रशांत भड तसेच पशुधन विकास अधिकारी डॉ. निलेश खलाटे उपस्थित होते.

महापशुधनवार्ता या डिजीटल ई-मासिकाने नुकतेच दुसऱ्या वर्षात यशस्वी पदार्पण केले असून, आजपर्यंत सलग 16 अंक प्रकाशित करण्याचा उल्लेखनीय टप्पा गाठला आहे. महापशुधनवार्ताचे सर्व प्रकाशित अंक पशुसंवर्धन विभागाच्या संकेतस्थळावर वाचकांसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

## पशुपालनामध्ये भारताचे ऐतिहासिक पाऊल!



ICAR-NIHSAD (भोपाळ) च्या वैज्ञानिकांनी वराहांमधील अत्यंत घातक असलेल्या 'आफ्रिकन स्वाइन फीव्हर' (ASF) वर देशातील पहिली स्वदेशी 'MA-104 सेल-बेस्ड लाइव्ह अटेन्युएटेड लस' यशस्वीरीत्या विकसित केली आहे! या अभूतपूर्व यशाबद्दल ICAR चे महासंचालक व DARE चे सचिव डॉ. एम. एल. जाट यांच्या हस्ते मुख्य वैज्ञानिक डॉ. डी. सेंथिल कुमार, डॉ. के. राजूकुमार, डॉ. जी. व्यंकटेश, डॉ. फतेह सिंग आणि डॉ. अनिकेत सान्याल यांचा विशेष सत्कार करण्यात आला. *महत्त्वाचे मुद्दे:या संशोधनामुळेविशेषतः ईशान्य भारतातील वराह पालकांना नुकसानापासून आर्थिक दिलासा मिळणार आहे.पशुवैद्यकीय लस निर्मितीमध्ये भारत अधिक 'आत्मनिर्भर' होणार आहे.






पशुसंवर्धन आयुक्तालय, पुणे-67

भारतीय स्वातंत्र्यदिनानिमित्त पशुसंवर्धन आयुक्तालय, पुणे येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील (भा.प्र.से.) यांच्या हस्ते ध्वजारोहण पार पडले. यानंतर स्वातंत्र्य दिनानिमित्त आयोजित विशेष कार्यक्रमात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी वर्गाचा सन्मान करण्यात आला.

उपस्थितांना मार्गदर्शन करताना आयुक्त डॉ. किरण पाटील म्हणाले, "आजचा दिवस आपल्या राष्ट्राच्या स्वातंत्र्याचा अभिमान बाळगण्याचा, तसेच स्वातंत्र्यासाठी आपले अवघे आयुष्य समर्पित करणाऱ्या देशभक्तांना अभिवादन करण्याचा आहे. महापुरूषांनी या देशासाठी केलेले त्याग व समर्पण यापासून सदैव प्रेरणा घेऊन आपण मार्गक्रमण केले पाहिजे. उत्कृष्ट लोकसेवेच्या माध्यमातून शासन व्यवस्थेची प्रतिष्ठा वाढविण्यासाठी उल्लेखनीय योगदान देणाऱ्या कर्तव्यदक्ष अधिकारी व कर्मचाऱ्यांचा गौरव करण्याचा आहे. तसेच सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे व समर्पित सेवेमुळेच आपला विभाग आज 134 वर्षांची गौरवशाली परंपरा यशस्वीपणे पुढे नेऊ शकत आहे."

उत्कृष्ट काम करणारे अधिकारी व कर्मचारी भविष्यात अधिक उत्तम कामगिरी करून उच्च पदांवर पोहोचतील, असा विश्वास व्यक्त करत डॉ. पाटील पुढे म्हणाले की, आगामी काळात निस्वार्थ भावनेने काम करणाऱ्या सर्व संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या कार्याचे योग्य मूल्यमापन करून, विशेष कार्यक्रमांद्वारे त्यांचा गौरव केला जाईल. गेल्या काही दिवसांत विभागाने उद्दिष्टपूर्तीसाठी केलेले काम कौतुकास्पद असल्याचे नमूद करत ते म्हणाले, "येत्या काळात पशुसंवर्धन विभागात अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम राबवले जातील. यामुळे प्रत्येकाच्या वैयक्तिक कलागुणांना वाव मिळून आपला विभाग एका नव्या उमेदीने व आत्मविश्वासाने कार्य करेल." मनोगताच्या शेवटी त्यांनी सर्वांना स्वातंत्र्यदिनाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या.

या सोहळ्याला सहआयुक्त पशुसंवर्धन (मुख्यालय) डॉ. शैलेश केंडे, सहआयुक्त (पशुधन व नियोजन) डॉ. देवेंद्र जाधव, सहआयुक्त (गुणनियंत्रण) डॉ. प्रशांत कांबळे, सहआयुक्त (आयव्हीबीपी) डॉ. याहयाखान पठाण, प्रादेशिक सहआयुक्त (पुणे विभाग) डॉ. समीर बोरकर, सहआयुक्त (पशुआहार) डॉ. सुनील पसरटे, सहआयुक्त तथा सदस्य सचिव (गोसेवा आयोग) डॉ. शामकांत पाटील, सहसंचालक (सांख्यिकी) श्रीमती शिल्पा पांडे, उपआयुक्त तथा सदस्य सचिव (महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरण) डॉ. प्रशांत भड, उपआयुक्त पशुसंवर्धन (महाराष्ट्र प्राणी कल्याण मंडळ), लेखा व वित्त अधिकारीश्री. संदेश ओहाळ आदिंसह आयुक्तालयातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

















# गुणवत्ता व उत्कृष्ट सेवा सन्मानपत्र-2026 चे मानकरी






















# महाराष्ट्राच्या दुग्धव्यवसायाची नवी श्वेतक्रांती



डॉ. किरण पाटील (भा.प्र.से.)
आयुक्त पशुसंवर्धन,
महाराष्ट्र राज्य, पुणे- 67




आज परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. पूर्वी पशुपालक अनुभवाच्या आधारे उत्तम जनावर निवडत होता; आज विज्ञान जनावराच्या आनुवंशिक गुणवत्तेचा अभ्यास करून पुढील पिढी कशी असावी, हे ठरविण्याच्या टप्प्यावर पोहोचले आहे. हजारो वर्षांच्या पशुपालन परंपरेने आता प्रयोगशाळेतील अत्याधुनिक तंत्रज्ञानाची साथ घेतली आहे. महाराष्ट्रातील दुग्धव्यवसायात लिंग निश्चित वीर्यमात्रा (Sex Sorted Semen-SSS) आणि भ्रूण प्रत्यारोपण तंत्रज्ञान (Embryo Transfer Technology-ETT/IVF) यांचा वाढता वापर हा याच परिवर्तनाचा नवा अध्याय आहे.

### अनुभवातून निवड ते विज्ञानातून निवड

भारतीय उपखंडात पशुपालनाची परंपरा अत्यंत प्राचीन आहे. सिंधू संस्कृतीच्या काळातही गुरे, म्हशी, शेळ्या-मेंढ्या यांसारखे पशू मानवी जीवनाचा भाग होते. नदीम्हशीच्या पाळीवीकरणाबाबतच्या आनुवंशिक अभ्यासांमध्ये तिचा उगम भारतीय उपखंडाशी जोडला जातो आणि तिच्या पाळीवीकरणाची प्रक्रिया सिंधू संस्कृतीच्या प्रौढ टप्प्यापूर्वी किंवा त्या आसपास सुरू झाल्याचे संकेत मिळतात.त्या काळात उत्कृष्ट जनावरांची निवड ही निरीक्षण आणि अनुभवावर आधारित होती. ज्या गायी अधिक दूध देत, ज्या म्हशी निरोगी राहत किंवा ज्या पशूंची संतती चांगली होत, त्यांचे संगोपन केले जात असे. पिढ्यान्‌पिढ्या अशा निवडीमधून स्थानिक पशुधनाच्या विविध जाती आणि प्रकार विकसित झाले.

आज त्याच प्रक्रियेला विज्ञानाने नवी दिशा दिली आहे. अनुवंशिक गुणवत्ता आता केवळ बाह्य रूप किंवा अनुभवावरून ठरवली जात नाही; निवडक पैदास, वीर्यमात्रा, भ्रूण आणि आधुनिक प्रजनन तंत्रज्ञानाच्या मदतीने उच्च गुणवत्तेची पुढील पिढी निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

### प्रयोगशाळेतील अनेक उच्च गुणवत्तेची वासरे

नैसर्गिक पद्धतीत किंवा पारंपरिक प्रजनन पद्धतीत एका गायीपासून साधारणपणे वर्षाला एक वासरू मिळते. त्यामुळे एखाद्या अत्यंत उच्च गुणवत्तेच्या दाता गाईचे आनुवंशिक गुण पुढील पिढीत मोठ्या प्रमाणात नेण्यासाठी अनेक वर्षे लागतात.याच ठिकाणी भ्रूण प्रत्यारोपण तंत्रज्ञान मोठा बदल घडवते. उच्च अनुवंशिक गुणवत्ता असलेल्या दाता गाईच्या स्त्रीबीजांचे संकलन करून प्रयोगशाळेत निवडक उच्च गुणवत्तेच्या वळूच्या वीर्याने फलन केले जाते. त्यातून तयार झालेला भ्रूण प्राप्तकर्ता गाय किंवा म्हशीच्या गर्भाशयात प्रत्यारोपित केला जातो. त्यामुळे एका उच्च गुणवत्तेच्या दाता गाईच्या आनुवंशिक क्षमतेचा मोठ्या संख्येने पुढील पिढीत प्रसार करणे शक्य होते.

श्रूण प्रत्यारोपण तंत्रज्ञानामुळे एका उच्च गुणवत्तेच्या दाता गाईपासून वर्षभरात 40 ते 50 उच्च दर्जाची वासरे मिळविण्याची क्षमता निर्माण होऊ शकते. म्हणजेच, पूर्वी एका उत्कृष्ट गाईची गुणवत्ता एका वासरापुरती मर्यादित राहायची; आता त्याच आनुवंशिक क्षमतेचा अनेक वासरांमध्ये प्रसार करता येतो. याच अर्थाने ETT/IVF हे पशुपालनातील 'टेस्ट ट्यूब बेबी' तंत्रज्ञान म्हणून ओळखले जाते.




## नर की मादी? आता निवडीला विज्ञानाची जोड

दुग्धव्यवसायात मादी वासराला विशेष आर्थिक महत्त्व आहे. पारंपरिक कृत्रिम रेतनात नर किंवा मादी वासरू जन्मण्याची शक्यता साधारण 50:50 असते. मात्र, लिंग निश्चित वीर्यमात्रा म्हणजे Sex Sorted Semen तंत्रज्ञानामुळे मादी वासरू जन्मण्याची शक्यता 90 टक्क्यांपेक्षा अधिक करण्याचे उद्दिष्ट साध्य करता येते. या प्रक्रियेत मादी संततीसाठी आवश्यक 'X' गुणसूत्र असलेले शुक्राणू निवडून वीर्यमात्रा तयार केली जाते. यामुळे दूध उत्पादनासाठी उपयुक्त कालवडींची संख्या वाढविण्याची संधी मिळते. उच्च वंशावळीच्या वळूची वीर्यमात्रा वापरल्यास अधिक दूध उत्पादनक्षम कालवडी मिळण्याची शक्यता वाढते. त्याचवेळी नर वासरांच्या संगोपनावरील अनावश्यक खर्चात बचत होऊ शकते. मात्र हे तंत्रज्ञान सर्वच जनावरांसाठी सरसकट वापरण्याऐवजी सुदृढ कालवडी तसेच प्रथम किंवा द्वितीय वेतातील निरोगी गाई-म्हशी, योग्य माजाची वेळ व तज्ज्ञ पशुवैद्यकीय मार्गदर्शन यांचा विचार करून वापरणे आवश्यक आहे. कारण सेक्स सॉर्टेड वीर्यमात्रेतील शुक्राणूंची संख्या तुलनेने कमी असल्याने सामान्य वीर्यमात्रेपेक्षा गर्भधारणेचे प्रमाण काहीसे कमी असू शकते.

'वंश जपणे' ते 'वंश सुधारणा'प्राचीन पशुपालकासाठी आपल्या परिसरातील पशुधनाची जात आणि गुणधर्म टिकविणे महत्त्वाचे होते. आधुनिक पशुविज्ञान त्यापुढे जाऊन वंशसंवर्धनासोबत अनुवंशिक सुधारणा करण्याची संधी देत आहे. गिर, साहिवाल, थारपारकर या राष्ट्रीय जातींसोबत महाराष्ट्रातील खिलार, डांगी, देवणी, लाल कंधारी, गवळाऊ या गोवंशांच्या तसेच नागपुरी, मराठवाडी आणि पंढरपुरी म्हशींच्या संवर्धनासाठी भ्रूण प्रत्यारोपण तंत्रज्ञान महत्त्वाचे ठरत आहे.याचा अर्थ केवळ अधिक दूध देणारे पशुधन तयार करणे एवढाच नाही. स्थानिक हवामानाशी जुळणारे, रोगप्रतिकारक क्षमता असलेले, शारीरिकदृष्ट्या सक्षम आणि चांगली दूध उत्पादनक्षमता असलेले पशुधन निर्माण करणे, हा या तंत्रज्ञानाचा व्यापक उद्देश आहे.

## महाराष्ट्राची प्रयोगशाळेतून श्वेतक्रांतीकडे वाटचाल

महाराष्ट्रात भ्रूण प्रत्यारोपण तंत्रज्ञानाच्या वापरात उल्लेखनीय प्रगती झाली आहे. डिसेंबर 2025 अखेरपर्यंत राज्यातील शासकीय, निमशासकीय आणि खासगी संस्थांच्या माध्यमातून 14,698 भ्रूण प्रत्यारोपण करण्यात आले असून त्यातून 2,473 उच्च गुणवत्तेच्या वासरांचा जन्म झाला आहे. पुण्यातील ताथवडे येथील बाह्यफलन व भ्रूण प्रत्यारोपण प्रयोगशाळा मार्च 2021 पासून महाराष्ट्र पशुधन विकास मंडळाच्या अंतर्गत कार्यरत आहे. आतापर्यंत येथे 240 OPU सत्रे पूर्ण झाली असून 780 भ्रूण तयार, 556 भ्रूण प्राप्तकर्ता जनावरांमध्ये प्रत्यारोपित आणि 150 भ्रूण गोठवून ठेवण्यात आले आहेत.



प्रकाशक: पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य

जुलै 2026 पर्यंत या तंत्रज्ञानातून 63 वासरांचा जन्म झाला असून 50 हून अधिक गाभण जनावरांकडून पुढील वासरांच्या जन्माची अपेक्षा आहे. ताथवडे प्रयोगशाळेतील कामगिरीतील एक विशेष टप्पा म्हणजे 23 जुलै 2022 रोजी 'शीतल' या देशातील पहिल्या पंढरपुरी म्हशीच्या बछडीचा भ्रूण प्रत्यारोपणातून झालेला जन्म. तसेच, मुऱ्हा म्हशीमध्ये एकाच स्त्रीबीज संकलनातून चार रेडकांचा जन्म झाल्याची नोंदही या क्षेत्रातील महत्त्वाची उपलब्धी आहे.

### महागडे तंत्रज्ञान पशुपालकांच्या गोठ्यापर्यंत

अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा सर्वात मोठा प्रश्न त्याची किंमत असतो. म्हणूनच संशोधन प्रयोगशाळेत निर्माण झालेले तंत्रज्ञान प्रत्यक्ष पशुपालकाच्या गोठ्यापर्यंत पोहोचणे महत्त्वाचे आहे. लिंग निश्चित वीर्यमात्रेचा मूळ खर्च साधारण रु. 1,200 ते रु. 1,500 असताना महाराष्ट्र शासनाने संबंधित कंपन्यांशी करार करून ती रु. 575 प्रति मात्रा या दराने उपलब्ध करून घेतली आहे. केंद्र शासनाचे 45 टक्के, राज्य शासनाचे 30 टक्के अनुदान आणि MahaLDB / सहकारी दूध संघामार्फत रु. 100 मदत अशा सवलतींमुळे पशुपालकांना ही वीर्यमात्रा अवघ्या रु. 81 प्रति मात्रा या दरात उपलब्ध करून देण्यात येत आहे.

डिसेंबर 2025 अखेरपर्यंत सुमारे 3.66 लाख वीर्यमात्रांचे वितरण झाले आहे. याचबरोबर राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळामार्फत स्वदेशी सेक्स सॉर्टेड सिमेन तंत्रज्ञान विकसित होत आहे. महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ आणि NDDB यांच्यातील सामंजस्य करार अंतिम टप्प्यात असून, भविष्यात हे तंत्रज्ञान आणखी कमी दरात उपलब्ध होण्याची अपेक्षा आहे. तसेच मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेतही याबाबत तरतूद करण्यात आली आहे.


दाता गाईमधून स्त्रीबीज संकलन


स्त्रीबीज परिपक्व करणे


परिपक्व स्त्रीबीज


तयार भ्रूण पुढील 7 दिवस सदर मशीनमध्ये बाष्पयुक्त वातावरणात व विशिष्ट रसायनामध्ये ठेवले जातात.

### गोशाळेतील कमी उत्पादनक्षम गायही आता 'प्राप्तकर्ता'

या तंत्रज्ञानाचा आणखी एक महत्त्वाचा फायदा म्हणजे उच्च अनुवंशिक गुणवत्तेचे भ्रूण वाढविण्यासाठी प्रत्येक जनावर उच्च गुणवत्तेचे असणे आवश्यक नाही. कमी दूध देणाऱ्या किंवा स्थानिक गाई-म्हशींचा प्राप्तकर्ता/दायी जनावर म्हणून उपयोग करता येतो. म्हणजेच, एखाद्या गोठ्यातील कमी उत्पादनक्षम जनावरालाही उच्च गुणवत्तेच्या वासराच्या जन्मप्रक्रियेत सहभागी करून घेता येते.

दि. 5 ऑक्टोबर 2023 च्या शासन निर्णयानुसार गोशाळा आणि सामान्य पशुपालकांनाही हे तंत्रज्ञान उपलब्ध करून देण्यात आले आहे. भ्रूण प्रत्यारोपणातून निरोगी वासराचा जन्म झाल्यास संबंधित पशुपालक किंवा गोशाळेला रु. 10 हजार प्रोत्साहनपर रक्कम देण्यात येते. त्यामुळे पशुधन संवर्धनासोबत ग्रामीण भागात अतिरिक्त उत्पन्नाचा मार्गही निर्माण होत आहे.

### प्रत्येक महसुली विभागात प्रयोगशाळा

तंत्रज्ञानाचा लाभ काही मोजक्या केंद्रांपुरता मर्यादित न ठेवता तो राज्याच्या कानाकोपऱ्यात पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. प्रत्येक महसुली विभागात भ्रूण प्रत्यारोपण प्रयोगशाळा स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ताथवडे येथील प्रयोगशाळा कार्यान्वित असून मुंबई विभागासाठी पेण, नागपूरसाठी हेटीकुंडी, छत्रपती संभाजीनगरसाठी हरसूल, नाशिकसाठी लोणी बुद्रुक व अमरावती विभागासाठी जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, अकोला येथे प्रयोगशाळा उभारण्याची कार्यवाही सुरू आहे. यामुळे प्रयोगशाळा आणि पशुपालक यांच्यातील अंतर कमी होणार आहे.

### 100 टक्के अनुदानातून तंत्रज्ञानाची दारे खुली

आधुनिक तंत्रज्ञानाचा लाभ आर्थिकदृष्ट्या सक्षम पशुपालकांपुरता मर्यादित राहू नये, यासाठी मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेअंतर्गत पात्र पशुपालकांना ETT आणि SSS या दोन्ही तंत्रज्ञानाचा लाभ 100 टक्के अनुदानावर देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राष्ट्रीय गोकुळ मिशनअंतर्गतही पशुपालकांसाठी विविध सुविधा उपलब्ध आहेत. यामुळे तंत्रज्ञान हे केवळ प्रयोगशाळेतील संशोधन न राहता प्रत्यक्ष ग्रामीण अर्थव्यवस्थेचा भाग बनत आहे.

हजारो वर्षांची परंपरा, आता नव्या विज्ञानाच्या हातातभारतातील पशुपालनाची कहाणी ही माणूस आणि पशू यांच्या सहजीवनाची कहाणी आहे. हजारो वर्षांपूर्वी पशुपालकाने आपल्या अनुभवातून चांगली गाय, चांगली म्हैस किंवा चांगली शेळी निवडली. पिढ्यान्‌पिढ्या त्या निवडीमधून पशुधनाच्या विविध जाती विकसित झाल्या. आज त्याच निवडीला आनुवंशिक विज्ञान, कृत्रिम रेतन, सेक्स सॉर्टेड सिमेन, OPU, IVF आणि भ्रूण प्रत्यारोपण यांची जोड मिळाली आहे.



पूर्वी "चांगले जनावर कोणते?" हा प्रश्न अनुभवातून सोडविला जात होता. आज "चांगल्या जनावराची आनुवंशिक गुणवत्ता पुढील पिढीत अधिक प्रभावीपणे कशी पोहोचवायची?" याचे उत्तर विज्ञान देत आहे. पूर्वी एका उत्कृष्ट गाईकडून वर्षाला एक वासरू मिळणे ही नैसर्गिक मर्यादा होती. आज त्याच उच्च गुणवत्तेच्या दाता जनावराच्या आनुवंशिक क्षमतेचा अनेक वासरांमध्ये प्रसार करण्याची क्षमता निर्माण झाली आहे.

पूर्वी पशुपालकाला नर किंवा मादी वासराच्या जन्माची प्रतीक्षा करावी लागत होती. आज लिंग निश्चित वीर्यमात्रेमुळे मादी कालवडींची शक्यता 90 टक्क्यांपेक्षा अधिक करण्याचे तंत्रज्ञान उपलब्ध आहे. आणि पूर्वी उत्कृष्ट वंशाची एखादी गाय किंवा म्हैस ही त्या एका गोठ्याची संपत्ती होती; आज तिच्या आनुवंशिक गुणवत्तेचा प्रसार संपूर्ण पशुधन क्षेत्रात करण्याची क्षमता निर्माण झाली आहे. हीच पारंपरिक पशुपालनापासून आधुनिक पशुविज्ञानापर्यंतची खरी झेप आहे.

म्हणून महाराष्ट्रातील श्वेतक्रांतीचा पुढील टप्पा केवळ जनावरांची संख्या वाढविण्यात नाही, तर उत्तम अनुवंशिक गुणवत्ता, अधिक दूध उत्पादन, निरोगी पशुधन, कमी खर्च आणि पशुपालकाचे वाढते उत्पन्न यात आहे. गोठ्यातील पारंपरिक पशुपालनाची हजारो वर्षांची परंपरा आता प्रयोगशाळेतील अत्याधुनिक विज्ञानाशी जोडली जात आहे. पशुपालकाच्या अनुभवाला आधुनिक तंत्रज्ञानाची साथ देऊन महाराष्ट्राच्या दुग्धव्यवसायाला अधिक उत्पादक, लाभदायक आणि शाश्वत बनविण्याच्या दिशेने ही नवी श्वेतक्रांतीची वाटचाल आहे.





लिंग निश्चित वीर्यमात्रा (Sex Sorted Semen-SSS) आणि भ्रूण प्रत्यारोपण तंत्रज्ञानाने जन्मलेली वासरे





प्रकाशक: पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य


मानदेशाची शान...
महाराष्ट्र कर्नाटक चॅम्पियन बकरा








**डॉ. सचिन अंकुश दडस**
(प्रक्षेत्र व्यवस्थापक: पु.अ.मेंढी व
शेळी विकास प्रक्षेत्र,रांजणी, 8329398369)

**डॉ. सचिन हरिभाऊ टेकाडे,**
(सहाय्यक संचालक, पु.अ.म.मेंढी व
शेळी विकास महामंडळ, 8888890270)

राष्ट्रीय पशु अनुवांशिक संसाधन ब्युरो (ICAR- NBAGR), कर्नाल, हरियाणा यांनी या अगोदर महाराष्ट्रातील मेंढ्यांच्या जातींचा अभ्यास करून महाराष्ट्रात दख्खनी जातीच्या मूळ मेंढीच्या लोणंद दख्खनी, सोलापूर/सांगोला दख्खनी, कोल्हापूर दख्खनी, माडग्याळ आणि संगमनेरी अशा पाच उपजाती आहेत असे स्पष्ट केले होते. या पाच उपजातींपैकी माडग्याळ हि जात तिच्या गुणवैशिष्ठ्यांमुळे मेंढपाळांमध्ये मोठ्या प्रमाणत स्वीकारली गेली असून ती स्थानिक मेंढ्याच्या संकराकरिता वापरण्यात येत आहे. त्यामुळे माडग्याळ मेंढीला राज्यभर व शेजारील राज्यात मोठ्या प्रमाणात मागणी वाढली आहे.

दि. 07 ऑगस्ट 2026 रोजी राष्ट्रीय पशु अनुवांशिक संसाधन ब्युरो (ICAR- NBAGR), कर्नाल, हरियाणा येथे पार पडलेल्या जात नोंदणी समितीच्या 14 व्या बैठकीत माडग्याळ मेंढीला स्वतंत्र देशी मेंढी म्हणून नोंदणीला मान्यता दिली आहे. माडग्याळ मेंढीचे मूळ क्षेत्र हे महाराष्ट्र व कर्नाटक राज्य घोषित केले असून तिला INDIA_SHEEP_1108_MADGYAL_14049 असा अधिकृत नोंदणी क्रमांक देण्यात आला आहे. हि जात देशातील 49 व्या क्रमांकाची नोंदणीकृत देशी मेंढीची जात ठरली आहे. निवड पद्धतीचा अवलंब करून मागील तीन दशकांच्या प्रयत्नातून हि जात मेंढपाळांच्या दारात विकसित झाली असून हि मेंढी मांस उत्पादनाकरिता अग्रेसर आहे. या जातीच्या मेंढ्याची गुणवैशिष्ट्ये-

(पुढील पृष्ठावर...)



**प्रकाशक:** पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य



**मुळस्थान व व्याप्ती:-** महाराष्ट्र राज्यातील सांगली जिल्ह्यातील जत, कावाठेमहांकळ, आटपाडी तालुके, सोलापूर जिल्ह्यातील सांगोला, पंढरपूर, माळशिरस, मंगळवेढा हे तालुके, सातारा जिल्ह्यातील माण, खटाव, फलटण तालुके, पुणे जिल्ह्यातील दौंड, इंदापूर, बारामती या ठिकाणी मोठ्या प्रमाणात या मेंढ्या आढळतात. कर्नाटक राज्यात विजापूर, बागलकोट, अथणी, ईंडी या भागात माडग्याळ मेंढ्या आढळतात.

**रंग:-** शरीरावर पांढऱ्या मूळ रंगावर काळे किंवा तपकिरी रंगाचे लहान मोठ्या आकाराचे ठिपके किंवा पट्टे असतात. कानावर खालच्या बाजूला काळ्या किंवा तपकिरी रंगाचे मोठे ठिपके असतात. डोळ्याभोवती काळ्या / तपकिरी रंगाची वर्तुळे असतात. जर पांढऱ्या रंगावर काळ्या रंगांचे ठिपके किंवा पट्टे असतील तर अशा मेंढ्यांना **"डफळ्या मेंढ्या"** म्हणून संबोधले जाते.

**डोके:-** डोके हे बहिर्वक्र असून नर आणि मादी यांना शिंगे नसतात. डोळे पाणीदार असून बुब्बुळे काळ्या रंगाची असतात.

**नाक:-** नाकाच्या आकारामुळे या मेंढीच्या सौंदर्यात भर पडते. नाक हे रोमन प्रकारचे म्हणजेच पोपटाच्या/ गरुडाच्या चोचीप्रमाणे किंवा विळ्याप्रमाणे वक्र असते. बाजारामध्ये मेंढीची किंमत हि नाकाच्या वक्रत्तेवरून ठरते. जेवढे नाक जास्त वक्र तेवढी त्या मेंढीची किंमत जास्त.

**कान:-** कान हे पांढऱ्या रंगाचे असून त्यावर खालच्या बाजूला काळ्या किंवा तपकिरी रंगाचे चट्टे असतात. कान मध्यम आकाराचे व जमिनीच्या दिशेने लोंबलेले असतात. प्रौढ नराच्या व मादीच्या कानाची लांबी 18 ते 25 सें.मी. असते.

**कास:-** कास हि आकाराने गोलाकार असून सडे 2.5 ते 3.5 सें.मी.लांबीची असतात.

**शेपटी:-** शेपटी हि आखूड, सडपातळ असून ती कासेकडील बाजूस वळलेली असते. नराची शेपटी हि मादीच्या शेपातीपेक्षा किंचीतशी लांब असते. शेपटीचा रंग हा पूर्ण पांढरा/ काळा/तपकिरी असतो. काही मेंढ्यामध्ये शेपटीचा रंग पांढरा-काळा/पांढरा-तपकिरी असा मिश्र असतो. प्रौढ नराच्या शेपटीची लांबी 15 ते 31 सें.मी. व प्रौढ मादीच्या शेपटीची लांबी 12 ते 18 सें.मी. असते.

**शारीरिक रचना:-** या जातीच्या मेंढ्या उंच, मजबूत बांध्याच्या, कटक, माळरानावर फिरुन चराई करणाऱ्या, स्थलांतरणासाठी व अर्धबंदिस्त मेंढीपालनास उपयुक्त, उष्ण व समशीतोष्ण हवामानामध्ये तसेच प्रतिकूल हवामानामध्ये तग धरून उच्च उत्पन्न देण्याची क्षमता आहेत. प्रौढ नराचे व मादीचे सरासरी वजन अनुक्रमे 57 किलो व 50 किलो असते. प्रौढ नराची व मादीची सरासरी लांबी हि अनुक्रमे 87 सें.मी. व 82 सेंमी असते. प्रौढ नराची व मादीची उंची अनुक्रमे 88 व 83 सेंमी असून छातीचा घेर अनुक्रमे 92 व 88 सेंमी असते.

**पुनरुत्पादन:-** या मेंढ्यामध्ये उत्तम प्रकारची मातृत्व क्षमता असून कोकरांना संगोपन करण्याची क्षमता इतर जातींपेक्षा अतिउत्तम आहे. यां मेंढ्या 210 ते 330 दिवस या वयात प्रथम माजावर येतात तर 280 ते 330 दिवस या वयात प्रथम फळविल्या जातात व वयाच्या 390 ते 510 दिवसात प्रथम वितात. या मेंढ्याच्या दोन माजांमधील अंतर 17 ते 22 दिवस, दोन वेतांमधील अंतर 210 ते 270 दिवस व विल्यानंतर पुन्हा गाभ जाण्याचा कालावधी 60 ते 110 दिवस आहे. या मेंढ्याची जनन टक्केवारी 85 ते 150 % तर जुळी पिल्ले देण्याचे प्रमाण 1 ते 2 % इतके आहे.

**दुध उत्पादन:-** मेंढ्या विल्यानंतर 90 ते 150 दिवस देतात. या मेंढ्यांचे सरासरी प्रति दिन प्रति मेंढी दुध उत्पादन 400 ते 1200 ग्राम इतके असते व एका वेतातील दुध उत्पादन प्रति मेंढी 48 ते 150 किलो असते.

**मेंढीपासून उत्पादित होणारी कोकरे:-** माडग्याळ मेंढ्यांची कोकरे हि इतर जातीच्या मेंढ्याच्या कोकरांच्या तुलनेत सशक्त व निरोगी असतात. कोकारांमध्ये नर कोकाराचे जन्मतः वजन 3 ते 5 किलो तर मादी कोकराचे वजन 2.5 ते 4.5 किलो असते. तीन महिन्याच्या नर कोकराचे वजन 19 ते 32 किलो व मादी कोकराचे वजन 16 ते 30 किलो होते. सहा महिन्याच्या नर कोकराचे वजन 30 ते 49 किलो तर मादी कोकराचे वजन 20 ते 48 किलो आणि एक वर्ष वयोगटातील नराचे वजन 44 ते 60 किलो ते मादीचे वजन 30 ते 51 किलो होतो. या जातीपासून उत्पादित होणाऱ्या कोकारांचा वजन वाढीचा दर इतर जातीच्या कोकारांपेक्षा जास्त आहे त्यामुळे कोकरे जन्मापासून 75 ते 150 दिवसांत विक्रीस येतात व विक्रीच्या वेळेस त्यांचे वजन 19 ते 38 किलो होते. मांसाचा उतारा 54% ते 60 % इतका आहे.

**लोकर उत्पादन:-** माडग्याळ मेंढी हि मांस उत्पादनाकरीता अग्रेसर असून तिच्यापासून लोकर उत्पादन खूप कमी प्रमाणात उपलब्ध होते. लोकरीची प्रत हि जाडी भरडी असून तिच्या धाग्याची लांबी 28 ते 45 मिमी इतकी असून धाग्याचा व्यास हा 37 मायक्रोन असतो. सहा महिन्याच्या वयात प्रथम लोकर कातरणी करण्यात येत असते त्यानंतर प्रत्येक सहा महिन्यांनी लोकर कातरणी करावी लागते. एका माडग्याळ मेंढीपासून प्रति कातरणी 300 ते 400 ग्राम लोकर मिळते. उत्पादित लोकरीपासून जेन व उषा बनविण्यात येतात.

पुण्यश्लोक अहिलाय्देवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळाअंतर्गत असलेल्या प्रक्षेत्र रांजणी ता. कवठेमहांकाळ जि. सांगली, प्रक्षेत्र महूद, ता. सांगोला जि. सोलापूर व प्रक्षेत्र दहिवडी ता. माण जि. सातारा येथे शुद्ध, जातिवंत माडग्याळ जातीच्या मेंढ्याचे पैदास, जतन, संगोपन व संवर्धन करण्याचे काम चालू आहे. त्याचबरोबर माडग्याळ मेंढ्यांच्या जतन आणि संवर्धनासाठी राजमाता माडग्याळ मेंढी पैदासकार संघटना, अंकले ता. जत जि. सांगली येथे कार्यरत आहे. महामंडळाच्या प्रक्षेत्रांवरुन तसेच माडग्याळ मेंढी पैदासकार संघटनेमार्फत शुद्ध, जातिवंत माडग्याळ मेंढ्यांची विकारी करण्यात यते.







डॉ. नाना सोनवणे
सहआयुक्त पशुसंवर्धन
रोग अन्वेषण विभाग, औंध, पुणे


डॉ. सुनिल लहाने
उपआयुक्त पशुसंवर्धन
रोग अन्वेषण विभाग


डॉ. वैशाली वानखेडे
सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन
रोग अन्वेषण विभाग


डॉ. संजय पवार
पशुवैद्यकीय अधिकारी, रोग अन्वेषण विभाग, पुणे- 67

महाराष्ट्रात पशुधनाची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. दुग्ध व्यवसाय व शेतीपूरक व्यवसायांचा कणा असलेल्या या पशुधनाचे विविध साथीच्या रोगांपासून संरक्षण करणे अत्यंत आवश्यक आहे. भारताचा दुग्ध उत्पादनात जगात प्रथम क्रमांक (176.35 दशलक्ष मेट्रिक टन) असला, तरी पशुरोगांमुळे दुग्ध व्यवसायाच्या अपेक्षित वाढीवर व उत्पादकतेवर मर्यादा येतात. या पार्श्वभूमीवर, केंद्र शासनाच्या राष्ट्रीय पशु रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत (NADCP) लाळखुरकत रोगाचे (FMD) संपूर्ण नियंत्रण व निर्मूलन करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. लसीकरणाची खरी परिणामकारकता तपासण्यासाठी सेरो-मॉनिटरिंग ही अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया आहे. याबाबत...

## महाराष्ट्रातील पशुधन स्थिती

| पशुधन प्रकार | संख्या (दशलक्ष) |
|---|---|
| गायवर्ग | १३.११ दशलक्ष |
| म्हैसवर्ग | ५.६० दशलक्ष |
| मेंढ्या | १०.६० दशलक्ष |
| शेळ्या | २.६८ दशलक्ष |
| वराह (डुक्कर) | ०.९६ दशलक्ष |



### लाळ खुरकत (FMD) रोग: स्वरुप, लक्षणे व नुकसान

#### रोगाची ओळख व प्रसार

लाळ खुरकत हा विषाणूजन्य व अत्यंत संसर्गजन्य आजार आहे. हा आजार गाय, म्हैस, शेळी, मेंढी व वराह यांसारख्या दोन खुरांच्या (Cloven-footed) प्राण्यांना बाधित करतो. भारतात या विषाणूचे मुख्यत्वे O, A व Asia-1 हे तीन सेरोटाईप्स (Serotypes) आढळतात.

#### प्रसाराची माध्यमे:

1. आजारी पशूच्या थेट संपर्कातून
2. श्वासोच्छ्वास व हवेद्वारे
3. दूषित पाणी, भांडी व गव्हाणीतून
4. शेण, मूत्र व दूषित दुधाद्वारे
5. बाधित वाहने, पशुपालक व पाळीव प्राण्यांच्या हालचालीतून
6. एकत्र चराईच्या ठिकाणी वेगाने प्रसार होतो.

### रोगाची प्रमुख लक्षणे

- तीव्र ताप व तोंडातून सतत लाळ गळणे (Drooling/Salivation).
- जिभेवर, हिरड्यांवर व तोंडाच्या आतील भागात फोड (Tongue vesicles) येणे व जखमा होणे.
- खुरांच्या मधील भागात (Inter digital space) व कासेवर/स्तनांवर फोड (Teat vesicles) येणे.
- लंगडणे व चारा न खाणे.

### रोगामुळे होणारे आर्थिक नुकसान

1. **दुग्ध उत्पादन:** दुधाच्या प्रमाणात प्रचंड घट होते.
2. **प्रजनन क्षमता:** गाभण पशूंचे गर्भपात होणे किंवा वंध्यत्वाची (Infertility) समस्या निर्माण होणे.
3. **कार्यक्षमता:** कामकरी बैलांची ताकद व कार्यक्षमता कायमची कमी होणे.
4. **वासरांची वाढ:** लहान वासरांमध्ये रोगाची तीव्रता जास्त असल्याने वाढ खुंटणे व मृत्यू होणे.
5. **व्यापार:** आंतरराष्ट्रीय स्तरावर पशुजन्य पदार्थांच्या निर्यातीवर बंधने येतात.

## राष्ट्रीय पशु रोग नियंत्रण कार्यक्रम (NADCP)




सप्टेंबर 2019 मध्ये सुरु झालेल्या या महत्त्वाकांक्षी योजनेचे मुख्य निकष व उद्दिष्टे :

- 100% लसीकरण: सर्व गाई, म्हैसवर्गीय पशुधनातील FMD विरुद्ध लसीकरण.
- वेळापत्रक: दर 6 महिन्यांनी द्विसंयोजक लस (Bivalent Vaccine: O, A) देणे.
- वासरांचे लसीकरण: 4 ते 5 महिने वयात पहिले लसीकरण व 1 महिन्याने बूस्टर डोस.
- जंतनिर्मूलन: लसीकरणाच्या 1 महिना अगोदर अनिवार्य.
- डिजिटल नोंदणी: 'INAPH' वरून 'भारत पशुधन' (NDLM) डिजिटल प्रणालीमध्ये रूपांतरण करून प्रत्येक पशूला युनिक आयडी व 'पशु आरोग्य कार्ड' देणे.

### सेरो-मॉनिटरिंग फेरी- IX

सेरो-मॉनिटरिंग म्हणजे लसीकरणानंतर पशूंच्या शरीरात रोगाविरुद्ध पुरेशा प्रमाणात प्रतिपिंडे (Antibody Titer) तयार झाली आहेत की नाही, याचे शास्त्रीय मूल्यमापन करणे.

**फेरी-IX ची मुख्य उद्दिष्टे**

1. लसीकरणापूर्वी व लसीकरणानंतर रक्तजलातील (Serum) प्रतिपिंड पातळीची तुलना करणे.
2. पूर्वनियोजित गावांमधून वयोगटानुसार योग्य नमुने गोळा करणे.
3. लसीकरणाच्या डोस व वेळापत्रकाची प्रत्यक्ष परिणामकारकता तपासणे.
4. NADCP कार्यक्रमाच्या यशस्वितेची खात्री करणे.

नमुना चाचणी धोरण (Sampling Strategy): महाराष्ट्रातील 33 जिल्ह्यांतून 166 गावांची निवड करण्यात आली असून, 2,706 रक्तजल नमुने गोळा केले जाणार आहेत.

- प्रती गाव नमुने: 13 नमुने




प्रत्येक गावातील 13 नमुने तीन वयोगटांमध्ये 5 : 4 : 1 या गुणोत्तरात संकलित करावयाचे आहेत.

### नमुना निवडीसाठी अत्यंत महत्त्वाच्या सूचना

1. **वयोगटाचे तंतोतंत पालन:** दिलेल्या वयोगटातीलच प्राण्यांची निवड करावी, कारण यावर संपूर्ण अहवालाची अचूकता अवलंबून असते.
2. **प्रातिनिधिक निवड:** गावातील सर्व भागांतून नमुने घ्यावेत. एकाच पशुपालकाकडून सर्व नमुने घेणे टाळावे.
3. **योग्य वेळ:**
   - o **लसीकरणपूर्व (Pre-vac) नमुना:** लसीकरणाच्या दिवशी, लस देण्यापूर्वी घ्यावा.
   - o **लसीकरणपश्चात (Post-vac) नमुना:** लसीकरणानंतर 21 ते 28 दिवसांच्या कालावधीत घ्यावा.
4. **समान पशूची निवड:** ज्या पशूचा Pre-vaccination नमुना घेतला आहे, त्याच पशूचा Post-vaccination नमुना घेणे अनिवार्य आहे.
5. **केवळ रक्तजल (Serum):** प्रयोगशाळेत संपूर्ण रक्त न पाठवता त्यातून रक्तजल वेगळे करूनच सादर करावे.

**रक्तजल संकलन SOP (Standard Operating Procedure)**

**संकलन व सिरम वेगळे करण्याची प्रक्रिया**

1.निर्जंतुक सुई व सिरिंज (Sterile Needle & Syringe) वापरून मानेच्या शिरेतून (Jugular Vein) 4 ते 8 मि.ली. रक्त घ्यावे.

2. रक्तामध्ये कोणतेही Anticoagulant (रक्त न गोठवणारे औषध) वापरू नये.

3. कुपी 30 ते 60 मिनिटे सरळ उभी ठेवून रक्त गोठू द्यावे.

4. Centrifuge मशीन उपलब्ध असल्यास 1100-1300 g वर फिरवून स्पष्ट सिरम वेगळे करावे.

5. Centrifuge मशीन नसल्यास, रक्त उभे ठेवून रात्रभर 4°C ला / बर्फावर ठेवावे व दुसऱ्या दिवशी वरील स्वच्छ सिरम निर्जंतुक कुपीत काढावे.

6. किमान 2 मि.ली. Serum स्क्रू-कॅप असलेल्या पॉलीप्रॉपिलीन (Screw-cap Polypropylene Vial) कुपीत घ्यावे.

**लेबलिंग व कोडिंग (Labelling & Coding)**

• Water-proof Permanent Marker चाच वापर करावा, जेणेकरून वाहतुकीदरम्यान/बर्फामुळे लेबल पुसले जाणार नाही.

• गावनिहाय 1 ते 13 असे Sample Code द्यावेत.

• कोडिंग करताना गायवर्ग नमुन्यांना प्रथमाधान (उदा. C-1, C-2, C-3...) व त्यानंतर म्हैसवर्ग नमुन्यांना (उदा. B-1, B-2, B-3...) कोड द्यावेत.

▪ कुपीवरील कोड व सोबत पाठवल्या जाणाऱ्या 'Epidemiological Data Sheet' मधील माहिती तंतोतंत जुळली पाहिजे.

**शीत साखळी (Cold Chain) व नमुना वाहतूक**

रक्तजलाची गुणवत्ता टिकवून ठेवण्यासाठी शीत साखळी अबाधित राहणे आवश्यक आहे.

• **साठवणूक:** वेगळे केलेले सिरम तात्काळ –20°C वर फ्रीझरमध्ये ठेवावे.

• पॅकिंग:

o नमुने ठेवण्यासाठी Cryobox चा वापर करावा.

o किमान 1 इंच जाडीचा थर्माकोल बॉक्स वापरावा.

o कूलिंगसाठी शक्यतो Dry Ice किंवा –80°C ला थंड केलेले Ice Packs वापरावेत.

• कागदपत्रे: थर्माकोल बॉक्ससोबत गावनिहाय summary sheet व सॉफ्ट/हार्ड कॉपी सोबत पाठवावी.

• वाहतूक: नमुने विनाविलंब व शीत साखळी न तुटता विशेष दुतामार्फत (Courier/Special Messenger) रोग अन्वेषण विभाग, औंध, पुणे येथे पाठवावेत. नमुने पाठवण्यापूर्वी प्रयोगशाळेस दूरध्वनीवरून पूर्वकल्पना द्यावी. तसेच सदरचे सर्व नमुने विभागीय रोग विभागीय रोग अन्वेषण प्रयोगशाळेमार्फत सादर करावेत.

**प्रयोगशाळा चाचणी: SPCE ELISA तंत्रज्ञान**

नमुन्यांची तपासणी करण्यासाठी प्रयोगशाळेत Solid Phase Competitive ELISA (SPCE) या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जातो.

**SPCE चा मुख्य आधार**

• Structural Proteins विरुद्ध प्रतिपिंडे: लसीकरणानंतर प्राण्याच्या शरीरात विषाणूच्या Structural Proteins (O, A, Asia-1) विरुद्ध प्रतिपिंडे निर्माण होतात. SPCE याद्वारे या प्रतिपिंडांची पातळी (Protective Titer) अचूक मोजते.

• संसर्ग विरुद्ध लसीकरण फरक:

o नैसर्गिक संसर्ग: Structural + Non-structural proteins (NSP) दोन्हीविरुद्ध प्रतिपिंडे तयार होतात.

o लसीकरण: प्रामुख्याने Structural proteins विरुद्धच प्रतिपिंडे तयार होतात.

सेरो-मॉनिटरिंग फेरी-IX ची यशस्वी अंमलबजावणी ही FMD मुक्त महाराष्ट्राच्या दिशेने टाकलेले महत्त्वपूर्ण पाऊल आहे. जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय, तालुका लघु पशु सर्वचिकित्सालय व पशुधन विकास अधिकारी यांनी समन्वय साधून क्षेत्रीय कर्मचाऱ्यांना सिरम संकलनाचे प्रात्यक्षिक व प्रशिक्षण द्यावे. केंद्र शासनास FMD नियंत्रणाचा अहवाल विहित मुदतीत सादर करायचा असल्याने, लसीकरणपूर्व व पश्चात चाचणीचे नमुने व डेटा वेळेत प्रयोगशाळेकडे सादर करणे अत्यंत बंधनकारक आहे. योग्य वयोगटातील पशूंची निवड, मानकीकृत सिरम संकलन व कडक शीत साखळी व्यवस्थापन या त्रिसूत्रीच्या आधारे ही फेरी यशस्वी करून 2030 पर्यंत लाळ खुरकत रोग निर्मूलनाचे राष्ट्रीय ध्येय साध्य करणे शक्य होईल.








प्रकाशक: पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य




पावसाळा सुरू झाला की निसर्ग हिरवाईने नटतो. शेतशिवार बहरते, जलस्रोत पाण्याने भरून येतात व वातावरणात प्रसन्नता निर्माण होते. मात्र, पावसाळ्याबरोबरच आरोग्याच्या दृष्टीने काही आव्हानेही निर्माण होतात. पाणी साचणे, चिखल व वाढलेली आर्द्रता, डास-माशांचा प्रादुर्भाव, दूषित पाणी, बुरशी लागलेले खाद्य तसेच अस्वच्छ परिसर यामुळे पशू व मानवांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो. त्यामुळे या काळात 'वन हेल्थ' या संकल्पनेचा अंगीकार करणे अत्यंत आवश्यक आहे.


डॉ. विवेक खंडाईत (विषय विशेषज्ञ)
पशुवैद्यक व पशुविज्ञान
महाविद्यालय, उदगीर (9421706040)


डॉ. संदीप ढेंगे (विषय विशेषज्ञ)
पशुवैद्यक व पशुविज्ञान
महाविद्यालय, उदगीर

'वन हेल्थ' म्हणजे मानव, पशू व पर्यावरण यांच्या आरोग्याचा परस्परसंबंध लक्षात घेऊन आरोग्यविषयक समस्या सोडविण्याचा एकात्मिक दृष्टिकोन होय. मानव व पशू एकाच पर्यावरणात राहतात. आपण अनेकदा समान जलस्रोत, अन्नसाखळी व नैसर्गिक संसाधनांवर अवलंबून असतो. त्यामुळे पशूंचे आरोग्य, मानवांचे आरोग्य व पर्यावरणाचे आरोग्य हे एकमेकांशी घट्टपणे जोडलेले आहे.

पावसाळ्यात पशुपालकांनी सर्वप्रथम पशूंच्या गोठ्याच्या स्वच्छतेकडे लक्ष देणे आवश्यक आहे. गोठ्यात पाणी साचू देऊ नये व पाण्याचा योग्य निचरा होईल, अशी व्यवस्था करावी. शेण, मूत्र व इतर कचरा नियमितपणे साफ करावा. गोठा हवेशीर व शक्यतो कोरडा ठेवावा. ओलसर व अस्वच्छ वातावरणामुळे संसर्गजन्य रोगांचा धोका वाढू शकतो.

पावसाळ्यात डास, माशा, गोचीड व इतर बाह्य परजीवींचा प्रादुर्भावही वाढतो. त्यामुळे पशूंच्या शरीराची नियमित तपासणी करावी. गोचीड किंवा इतर परजीवी आढळल्यास पशुवैद्यकांच्या सल्ल्याने योग्य उपचार करावेत. पशूंमध्ये ताप, भूक मंदावणे, अशक्तपणा, अतिसार, खोकला, श्वास घेण्यास त्रास किंवा त्वचेवर गाठी यांसारखी लक्षणे दिसल्यास स्वतःहून औषधोपचार न करता त्वरित पशुवैद्यकीय सल्ला घ्यावा.

पावसाळ्यात स्वच्छ पाणी व सुरक्षित खाद्य यांनाही विशेष महत्त्व आहे. अतिवृष्टी किंवा पावसामुळे विहिरी, तलाव व इतर जलस्रोत दूषित होण्याची शक्यता असते. त्यामुळे पशूंना स्वच्छ व सुरक्षित पाणी द्यावे. पाण्याची भांडी नियमितपणे स्वच्छ करावीत. साठवलेल्या खाद्यामध्ये ओलावा गेल्यास त्यावर बुरशी वाढू शकते. असे बुरशी लागलेले किंवा कुजलेले खाद्य पशूंना देऊ नये. सुरक्षित व पौष्टिक खाद्यामुळे पशूंची रोगप्रतिकारक क्षमता टिकून राहण्यास मदत होते.

पावसाळ्यात संसर्गजन्य रोगांचा प्रसार होण्याची शक्यता लक्षात घेता आजारी पशूंना निरोगी पशूंपासून वेगळे ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. नवीन पशू खरेदी केल्यानंतर त्यांना त्वरित कळपात मिसळण्याऐवजी काही काळ स्वतंत्र ठेवून त्यांच्या आरोग्याचे निरीक्षण करावे. आवश्यकतेनुसार पशुवैद्यकांकडून तपासणी करून घ्यावी. यामुळे पशुधनामध्ये रोगांचा प्रसार रोखण्यास मदत होते.

वन हेल्थच्या संदर्भात झूनोटिक म्हणजेच पशूजन्य रोग हा अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. काही संसर्गजन्य रोग पशूंपासून मानवांमध्ये संक्रमित होऊ शकतात. रेबीज, ब्रुसेलोसिस, क्षयरोग व अँथ्रॅक्स यांसारख्या रोगांबाबत पशुपालकांनी विशेष दक्षता बाळगणे आवश्यक आहे. आजारी किंवा संशयित पशू हाताळताना रक्त, लाळ, मूत्र, विष्ठा किंवा इतर शरीरातील स्त्रावांशी थेट संपर्क टाळावा. आवश्यकतेनुसार हातमोजे व इतर संरक्षणात्मक साधनांचा वापर करावा.

पशूंची प्रसूती किंवा गर्भपात झाल्यास त्यातील पदार्थ उघड्या हाताने हाताळू नयेत. अशा परिस्थितीत पशुवैद्यकांना माहिती देऊन त्यांच्या मार्गदर्शनानुसार योग्य पद्धतीने विल्हेवाट व परिसराची स्वच्छता करावी. अशा छोट्या-छोट्या काळजीच्या उपायांमुळे मानवांमध्ये रोगांचा प्रसार होण्याचा धोका कमी करता येतो.




रेबीज हा अत्यंत गंभीर व जीवघेणा रोग असून त्यापासून प्रतिबंधात्मक उपायांनी संरक्षण करता येते. पाळीव कुत्रे व मांजरींचे नियमित रेबीज प्रतिबंधक लसीकरण करून घेणे आवश्यक आहे. कुत्रा, मांजर किंवा संशयित प्राण्याने चावा घेतल्यास जखम त्वरित साबण व भरपूर वाहत्या पाण्याने स्वच्छ धुवावी. जखमेवर मिरची, चुना, तेल, हळद किंवा कोणतेही घरगुती पदार्थ लावू नयेत. चावा लहान असला तरी त्वरित वैद्यकीय सल्ला घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

पावसाळ्यात पर्यावरणाची स्वच्छता राखणे हीदेखील वन हेल्थची महत्त्वाची बाजू आहे. घराभोवती, गोठ्याजवळ किंवा सार्वजनिक ठिकाणी पाणी साचू देऊ नये. साचलेल्या पाण्यामुळे डासांची पैदास होऊ शकते. पशूंच्या खाद्यपात्रांची व पाण्याच्या भांड्यांची नियमित स्वच्छता करावी. गोठ्यातील शेण व सेंद्रिय कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करावे. शेणाचा योग्य पद्धतीने वापर करून कंपोस्ट किंवा सेंद्रिय खत तयार करता येते. मृत पशूंची विल्हेवाट स्थानिक नियम व पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनानुसार करावी.

पशुवैद्यकीय औषधांचा, विशेषतः अँटिबायोटिक्स किंवा प्रतिजैविक औषधांचा वापर पशुवैद्यकांच्या सल्ल्याशिवाय करू नये. चुकीचे औषध, चुकीचा डोस किंवा उपचाराचा अपुरा कालावधी यामुळे सूक्ष्मजीव औषधांना प्रतिरोधक होऊ शकतात. यालाच प्रतिजैविक प्रतिरोधकता असे म्हणतात. ही समस्या केवळ पशूंसाठी नव्हे तर मानवांच्या आरोग्यासाठीही गंभीर आहे. त्यामुळे पशुवैद्यकांनी सांगितलेला औषधांचा डोस व उपचाराचा कालावधी पूर्ण करावा. उरलेली औषधे स्वतःहून पुन्हा वापरू नयेत. दूध देणाऱ्या पशूंना औषध दिल्यानंतर पशुवैद्यकांनी सांगितलेला औषधमुक्त कालावधी (Withdrawal Period) पाळणे आवश्यक आहे. यामुळे दूध, मांस व इतर पशूजन्य अन्नपदार्थ सुरक्षित ठेवण्यास मदत होते.

पशुधनाचे आरोग्य चांगले ठेवण्यासाठी लसीकरण हा रोगप्रतिबंधाचा प्रभावी उपाय आहे. शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार व स्थानिक पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सल्ल्यानुसार पशूंना आवश्यक लसीकरण करून घ्यावे. लसीकरणाची नोंद व्यवस्थित ठेवावी व वेळापत्रकानुसार पुढील लसीकरण करून घ्यावे. निरोगी पशुधनामुळे केवळ पशुपालकांचे आर्थिक नुकसान टाळण्यास मदत होत नाही, तर सुरक्षित पशूजन्य अन्न उत्पादनालाही हातभार लागतो.

वन हेल्थ ही केवळ पशुवैद्यक, डॉक्टर किंवा आरोग्य विभागाची जबाबदारी नाही. शेतकरी, आरोग्य कर्मचारी, ग्रामपंचायत, स्थानिक प्रशासन व सामान्य नागरिक या सर्वांचा वन हेल्थमध्ये महत्त्वाचा सहभाग आहे. पशूंच्या आरोग्याची काळजी घेणे, स्वच्छता राखणे, झूनोटिक रोगांबाबत जनजागृती करणे, औषधांचा योग्य वापर करणे व पर्यावरणाचे संरक्षण करणे या सर्व गोष्टी सामूहिक प्रयत्नांतूनच प्रभावीपणे साध्य होऊ शकतात.

पावसाळ्यातील आरोग्यविषयक आव्हानांना सामोरे जाताना आपण एक गोष्ट कायम लक्षात ठेवली पाहिजे—मानवाचे आरोग्य हे पशूंच्या आरोग्यापासून व पर्यावरणाच्या आरोग्यापासून वेगळे नाही. पशू निरोगी असतील, पर्यावरण स्वच्छ असेल व मानवांनी योग्य प्रतिबंधात्मक उपाय केले, तर अनेक आजारांचा धोका कमी करता येऊ शकतो. म्हणूनच या पावसाळ्यात आपण सर्वांनी एक संकल्प करूया—गोठा स्वच्छ ठेवूया, पशूंना स्वच्छ पाणी व सुरक्षित खाद्य देऊया, आजारी पशूंना वेगळे ठेवूया, आवश्यक लसीकरण करून घेऊया, झूनोटिक रोगांपासून सावध राहूया, रेबीज प्रतिबंधासाठी आवश्यक काळजी घेऊया, पशुवैद्यकीय औषधांचा विशेषतः अँटिबायोटिक्सचा जबाबदारीने वापर करूया व पर्यावरण स्वच्छ ठेवूया.






डॉ. रोहित धुमाळ
सहाय्यक आयुक्त
पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय
तालुका पशुवैद्यकीय दवाखाना,
धर्माबाद, जि. नांदेड

नवीन दुग्धव्यवसाय (Dairy Farming) सुरु करू पाहणाऱ्या तरुण मित्रांनो, आजकाल एक अतिशय रंजक चित्र पाहायला मिळत आहे. आयआयटी (IIT), आयआयएम (IIM) किंवा मोठ्या शहरांमधून कॉर्पोरेट नोकऱ्या सोडून अनेक उच्चशिक्षित तरुण प्रचंड उत्साहाने डेअरी व्यवसायात उतरत आहेत. त्यांच्या लॅपटॉपमध्ये एक अतिशय 'परफेक्ट बिझनेस प्लॅन' आणि 'एक्सेल शीट' (Excel Sheet) तयार असते.

या एक्सेल शीटमध्ये गणित अगदी सोपे आणि स्वप्नवत असते:

*"100 उच्च वंशावळीच्या गाई × 20 लिटर दूध × 40 रुपये प्रति लिटर = दिवसाला 80 हजार रुपयांचा गल्ला!"*

कागदावरील हे गणित पाहून अनेक जण 5 वर्षांत कोट्यवधींच्या नफ्याचे आडाखे बांधतात. पण, जेव्हा ही लॅपटॉपमधली 'एक्सेल शीट' प्रत्यक्ष मातीत उतरते, तेव्हा अनेक मोठे व्यवसाय पत्त्यांच्या बंगल्यासारखे कोसळताना दिसतात. असे का होते? त्यांची बुद्धिमत्ता कमी असते का? अजिबात नाही. त्यांची सर्वात मोठी चूक असते ती कॉर्पोरेट 'फॅक्टरी लॉजिक' जसेच्या तसे जिवंत 'शेतीच्या / पशुपालनाच्या लॉजिकमध्ये' वापरणे. नवीन व्यवसाय सुरु करण्यापूर्वी हा **'एमबीएचा सापळा'** समजून घेणे अत्यंत गरजेचे आहे.

## 1. फॅक्टरी लॉजिक विरुद्ध फार्म लॉजिक (नेमका फरक काय?)

- 'बायोलॉजिकल बिझनेस' : ऑटोमोबाईल कंपनीत मशीनला ठराविक इनपुट दिले की हमखास ठरलेले आउटपुट मिळते. मशीनला भावना, तणाव किंवा आजारपण नसते. पण, पशुपालन हा एक 'बायोलॉजिकल बिझनेस' आहे.
- मशीनला 'ओव्हरलोड' करता येते, सजीवाला नाही: फॅक्टरीमध्ये उत्पादन दुप्पट हवे असल्यास तुम्ही मशीन 24 तास सलग चालवू शकता. पण गाईला दुप्पट चारा खाऊ घातला, तर ती दुप्पट दूध देणार नाही; उलट ती आजारी पडून तिचे पचनतंत्र बिघडेल. सजीवांची एक नैसर्गिक क्षमता असते, जिला कॉर्पोरेट टार्गेट्सच्या दबावाखाली ताणता येत नाही.
- वातावरणाचा प्रभाव: फॅक्टरीत एसी लावून तापमान नियंत्रित करता येते. पण गोठ्यातील जनावरे पर्यावरणाशी थेट जोडलेली असतात. अति उष्णता, थंडी किंवा पावसाचा त्यांच्या शरीरावर व पर्यायाने दूध उत्पादनावर त्वरित परिणाम होतो.
- रेखीय वाढ विरुद्ध निसर्गाचे चक्र : फॅक्टरीमध्ये प्रगतीचा आलेख एका सरळ रेषेत (Linear) वेगाने वर जातो. पण गोठ्यात वाढ ही निसर्गाच्या चक्रानुसार (Cyclical) होते.
- कॉर्पोरेट क्वार्टर्स (Q1, Q2) विरुद्ध ऋतू: कॉर्पोरेट जगात दर तीन महिन्यांनी (Quarterly) नफ्याचा आलेख वर जावा अशी अपेक्षा असते. पण पशूपालनात उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा यावर सर्व अवलंबून असते.
- नैसर्गिक चढ-उतार: उन्हाळ्यात जनावरांना 'हीट स्ट्रेस' (Heat Stress) आल्यामुळे दुधात नैसर्गिकरित्या घट होते, तर हिवाळ्यात आणि पावसाळ्यात हिरवा चारा उपलब्ध असल्याने उत्पादन वाढते. निसर्गाच्या या लहरीपणाला एक्सेल शीटच्या सरळ रेषेत बसवणे अशक्य असते. त्यामुळे उद्योजकाला निसर्गाच्या चक्रानुसारच आपले नियोजन बदलावे लागते.

### 'स्विच ऑफ' बटण आणि 24 तास चालणारे मेटाबॉलिझम

एखादा कॉर्पोरेट व्यवसाय तोट्यात गेला, तर मशीनचे 'स्विच ऑफ' करून फॅक्टरीला कुलूप लावता येते. पण गोठ्यातील गाईंचे पचनतंत्र 24 तास चालू असते.

'रनिंग कॉस्ट' कधीच थांबत नाही: जर बाजारात लॉकडाऊन लागला, मंदी आली, किंवा दुधाचे भाव अचानक पडले, तरीही तुम्ही गाईला असे म्हणू शकत नाही की, "आज दूध स्वस्त आहे, त्यामुळे आज चारा खाऊ नकोस."

जिवंत मालमत्तेचा खर्च: बाजारात मंदी असली किंवा दुधाचे भाव पडले, तरीही गाईला रोजचा चारा व खुराक द्यावाच लागतो. फॅक्टरी बंद केल्यावर मजुरांना कमी करून खर्च शून्यावर आणता येतो, पण जनावरांना जगवण्यासाठी व त्यांच्या शरीराची झीज भरून काढण्यासाठी रोजचा खर्च करावाच लागतो.


प्रकाशक: पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य







## 2. एक्सेल शीटचे 3 मोठे धक्के (Reality Shocks)

जेव्हा तुम्ही प्रत्यक्षात गोठ्यात पाऊल ठेवता, तेव्हा वास्तवाचे खालील तीन मोठे धक्के पचवण्याची तुमची तयारी असली पाहिजे: गोठ्यातील वास्तव आणि लॅपटॉपमधील एक्सेल शीट यात खूप मोठा फरक आहे. या तीन 'धक्क्यांचे' (Reality Shocks) अधिक सखोल आणि सविस्तर विश्लेषण खालीलप्रमाणे आहे. यामुळे नवीन उद्योजकांना या संकटांवर मात कशी करावी, हे समजण्यास मदत होईल:

**धक्का 1: 'एक्सेल शीट'ला कधीच मस्टायटीस होत नाही! (जैविक व वैद्यकीय जोखीम)**

- सविस्तर अर्थ: लॅपटॉपवर काम करताना आपण गृहीत धरतो की गाय 365 दिवस एकाच क्षमतेने काम करेल. पण एक्सेल शीटमध्ये गाईच्या 'आजारपणाच्या रजेसाठी' कोणताही रकाना नसतो, मात्र प्रत्यक्ष गोठ्यात तो हजर असतो.
- परिणाम: मस्टायटीस (स्तनदाह) सारखा आजार आल्यास चारपैकी एक सड कायमचा निकामी होऊ शकतो, ज्यामुळे दुधाचे कायमस्वरूपी नुकसान होते. 'रिपीट ब्रीडिंग' (Repeat Breeding) मुळे नवीन वासरासाठी 12 ऐवजी 18 महिने प्रतीक्षा करावी लागते. या वाढीव 6 महिन्यांत गाय दूध देत नाही, पण ती चारा मात्र रोज खाते, जो थेट तुमचा नफा खातो. तसेच, लाळ्या-खुरकूत किंवा लंपी यांसारख्या आजारांमुळे दुधाने भरलेली गाय एका रात्रीत अशक्त होऊन तिचे उत्पादन शून्यावर येऊ शकते.
- उद्योजकाचा उपाय: या जैविक नुकसानीवर मात करण्यासाठी गोठ्यात कठोर 'बायोसुरक्षा' (Biosecurity), सर्व जनावरांचे वेळेवर 'लसीकरण' आणि जनावरांचा 'विमा' (Insurance) असणे अत्यंत आवश्यक आहे.

**धक्का 2: खर्चाची रेषा सरळ नसते, ती 'ईसीजी' (ECG) सारखी असते! (आर्थिक अनिश्चितता)**

- सविस्तर अर्थ: एक्सेलवर प्रत्येक महिन्याचा चारा व खाद्याचा खर्च समान दिसतो. पण प्रत्यक्षात निसर्गाच्या लहरीपणामुळे हा खर्च रुग्णालयातील ईसीजी मशीनच्या रेषेसारखा सतत वर-खाली होत असतो.
- परिणाम: शेती व पशुपालन हे पूर्णपणे हवामानावर अवलंबून आहेत. जर पाऊस लांबला, तर बाजारात हिरव्या वैरणीचे भाव अचानक दुप्पट होतात. दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाल्यास मका व सरकी पेंड यांसारख्या महत्त्वाच्या कच्च्या मालाचे दर गगनाला भिडतात. त्यामुळे पशुपालन हा फिक्स्ड कॉस्टचा नाही, तर सतत बदलणाऱ्या 'व्हेरिअबल कॉस्ट'चा खेळ ठरतो.
- उद्योजकाचा उपाय: उद्योजकाने नेहमी हंगामात (जेव्हा चारा स्वस्त आणि मुबलक असतो) वर्षभराचा चारा खरेदी करून त्याचा 'मुरघास' बनवून साठवला पाहिजे. तसेच, बाजारातील चढउतारांना सामोरे जाण्यासाठी नेहमी 3 ते 6 महिन्यांचे खेळते भांडवल (Working Capital) राखून ठेवले पाहिजे.

**धक्का 3: गाई म्हणजे 'प्लग अँड प्ले' डिव्हाइस नाहीत! (क्लायमेट शॉक)**

- सविस्तर अर्थ: कॉम्प्युटरला पेनड्राईव्ह लावला की तो कोणत्याही मशीनवर चालतो. पण जनावरे ही सजीव असतात आणि ती त्यांच्या आजूबाजूच्या पर्यावरणाशी अत्यंत संवेदनशील असतात.
- परिणाम: पंजाब किंवा हरियाणासारख्या थंड प्रदेशातून 1 लाख रुपयांची उच्च वंशावळीची गाय महाराष्ट्रातील उष्ण व दमट वातावरणात आणली, तर तिला 'क्लायमेट शॉक' बसतो. या नव्या हवामानाशी जुळवून घेताना तिच्या शरीराची अर्धी ऊर्जा केवळ स्वतःला थंड ठेवण्यात खर्च होते. परिणामी, जिच्याकडून 20 लिटरची अपेक्षा असते, ती गाय थेट 12-15 लिटरवर येते.
- उद्योजकाचा उपाय: बाहेरून जनावरे आणण्याऐवजी स्थानिक वातावरणाशी जुळवून घेतलेली जनावरे खरेदी करण्यावर भर द्यावा. जर उच्च वंशावळीची जनावरे आणलीच, तर गोठ्यात उत्तम कुलिंग सिस्टीम (फॅन्स, फॉगर्स, हवेशीर छत) लावून त्यांच्यावरील हवामानाचा ताण कमी करावा. जनावरे जितकी शांत आणि तणावमुक्त, तितके दूध जास्त!

या सर्व गोष्टींवरून हेच सिद्ध होते की, डेअरी व्यवसाय हा लॅपटॉपवर नाही, तर गोठ्याच्या मातीत 'स्मार्ट व्यवस्थापनाने' मोठा होतो!

### 3. नवीन उद्योजकांसाठी 'स्मार्ट' टिप्स (चुका कशा टाळाव्यात?)

जर तुम्ही नव्याने डेअरी व्यवसाय सुरू करत असाल, तर या 'एमबीए ट्रॅप' मधून वाचण्यासाठी उद्योजकांसाठी हे तीन नियम म्हणजे खऱ्या अर्थाने 'यशाचा पाया' आहेत. या तीन नियमांचे (ज्याला आपण स्टार्टअप्सच्या चुका म्हणू शकतो) सविस्तर आणि सखोल विश्लेषण खालीलप्रमाणे आहे:

**नियम 1: 'रिमोट कंट्रोल' शेतीचा हव्यास सोडा**

अनेक उच्चशिक्षित उद्योजकांना असे वाटते की, आपण शहरात एसी केबिनमध्ये बसून, लॅपटॉप व मोबाईलवर सीसीटीव्हीच्या माध्यमातून शेकडो किलोमीटर दूर असलेला गोठा चालवू शकतो. हा सर्वात मोठा भ्रम आहे.

- **सीसीटीव्हीच्या मर्यादा:** सीसीटीव्ही कॅमेरा तुम्हाला फक्त एवढेच दाखवू शकतो की मजूर गोठ्यात काम करत आहेत की नाहीत. पण गाईच्या डोळ्यातील तेज कमी झाले आहे का, हे कॅमेऱ्यात दिसत नाही.
- **सूक्ष्म निरीक्षण:** जनावराच्या कातडीचा पोत खरखरीत झाला आहे का, किंवा गोठ्यात आजाराचा व अस्वच्छतेचा सूक्ष्म वास येतोय का, हे कोणताही सेन्सर किंवा कॅमेरा सांगू शकत नाही.
- **'टच अँड फील' :** पशुपालन हा 100% 'टच अँड फील'चा व्यवसाय आहे. जोपर्यंत मालक स्वतः गोठ्यातून चालत नाही, जनावरांच्या श्वासोच्छवासाचा आवाज ऐकत नाही व शेणाच्या वासावरून त्यांच्या पचनाचा अंदाज घेत नाही, तोपर्यंत आजार वेळेवर पकडले जात नाहीत.

'रिमोट कंट्रोल'ने तुम्ही टीव्ही चॅनेल नक्की बदलू शकता, पण जनावरांचे नशीब व व्यवसायाचे भविष्य नाही. मालकाची गोठ्यातील प्रत्यक्ष उपस्थिती अनिवार्य आहे.

**नियम 2: 'डेड इन्फ्रास्ट्रक्चर' ऐवजी जनावरांवर खर्च करा**

नवीन व्यावसायिक जेव्हा खिशात मोठे भांडवल घेऊन येतात, तेव्हा ते सर्वात मोठी घोडचूक 'गुंतवणुकीच्या प्राधान्यक्रमात' (Priority of Investment) करतात.

- **निर्जीव वास्तूवरील उधळपट्टी:** अनेक स्टार्टअप्स आपले 80% बजेट केवळ सिमेंटच्या भिंती, स्टीलचे मोठे शेड, फॅन्सी ऑफिस आणि महागड्या मशिनींवर (डेड इन्फ्रास्ट्रक्चर) खर्च करतात. परिणामी, मुख्य व्यवसाय सुरू करताना उच्च दर्जाची आणि दर्जेदार जनावरे (Live Stock) खरेदी करण्यासाठी त्यांचे पाकीट (Empty Wallet) रिकामे राहते.
- **सोन्याचे अंड देणारी कोंबडी:** गोठ्यातील मुख्य 'प्रॉफिट सेंटर' सिमेंटचे छत नसून गाईची कास (Udder) आहे. तुम्ही गाईला 50 लाखांच्या गोठ्यात ठेवा किंवा साध्या बांबूच्या शेडखाली ठेवा; जर तिची अनुवंशिकता 20 लिटरची असेल, तर ती 20 लिटरच दूध देईल.
- **खरा नियम:** नफा कधीही सिमेंट-विटांमधून मिळत नाही, तो गाईच्या कासेतून मिळतो. त्यामुळे तुमचा गोठा अतिशय साधा (कमी खर्चाचा) असला तरी चालेल, पण तुमची गाय ही उत्तम व 'उच्च वंशावळीची' असलीच पाहिजे, ही गोष्ट व्यवसाय करताना लक्षात घेणे गरजेचे आहे.



**नियम 3: वेगाचा घातक हव्यास टाळा**

सध्याच्या जगात 'स्केलिंग' (व्यवसाय वेगाने मोठा करणे) हा परवलीचा शब्द बनला आहे. पण फॅक्टरी व बायोलॉजिकल बिझनेसमध्ये फरक आहे.

- **कागदावरील भ्रम:** कागदावर किंवा पॉवरपॉईंट प्रेझेंटेशनमध्ये व्यवसायाचा विस्तार वेगाने करणे खूप छान व सोपे दिसते. "आज 10 गाई आहेत, पुढच्या महिन्यात 50 घेऊ व वर्षभरात 100 गाई करू," असे गणित मांडले जाते.
- **वास्तवातील गुंतागुंत:** वास्तवात, 10 गाई व 100 गाई सांभाळण्यात फक्त एका 'शून्याचा' फरक नसतो. 100 गाई करताना व्यवस्थापनाची गुंतागुंत चक्क 100 पटीने वाढते. 10 गाईंचे शेण काढणे, त्यांचा माज ओळखणे सोपे असते; पण 100 गाईंच्या कळपात आजारी गाय शोधणे हे आव्हानात्मक असते.
- **विनाशाचे कारण:** स्वतःचे 'व्यवस्थापन कौशल्य' व गोठ्याची सिस्टीम पूर्णपणे विकसित होण्याआधीच जर तुम्ही मोठा विस्तार केला, तर गोठ्यात आजार 10 पट वेगाने पसरतात. मजुरांचे प्रश्न अत्यंत बिकट होतात व संपूर्ण डोलारा काही महिन्यांतच कोसळतो.
- **यशस्वी मार्ग:** आधी 10 ते 15 गाईंवर स्वतःला सिद्ध करा. चारा नियोजन, मजुरांचे व्यवस्थापन व आजारांवर नियंत्रण मिळवण्याची तुमची 'सिस्टीम' सेट होऊ द्या. एकदा का मॉडेल 100% यशस्वी झाले, की मगच 100 गाईंकडे जा.

**थोडक्यात सांगायचे तर:** तंत्रज्ञानाचा वापर नक्की करा, पण तो निसर्गाच्या व जनावरांच्या मूळ स्वभावाला पूरक असावा, मारक नसावा!

## 'एमबीए'ची खरी ताकद कुठे वापरावी? (कॉर्पोरेट ज्ञानाचा गोठ्यातील अचूक वापर)

कॉर्पोरेट शिक्षण किंवा 'एमबीए'चे कौशल्य अजिबात वाईट नाही, पण त्याचा वापर निसर्गाला 'ऑप्टिमाईझ' (मशीनसारखे राबवून घेण्यासाठी) कधीच करू नये. जनावरांच्या नैसर्गिक मर्यादांचा आदर करून, तुमच्या व्यावसायिक ज्ञानाचा वापर गोठ्याबाहेरील 'इकोसिस्टीम' (Ecosystem) आणि व्यवस्थापन मजबूत करण्यासाठी कसा करावा, याचे सविस्तर विश्लेषण खालीलप्रमाणे आहे:

**1. सप्लाय चेन मॅनेजमेंट : चाऱ्याचे अर्थशास्त्र**

डेअरी व्यवसायात सर्वात मोठा (सुमारे 70%) खर्च हा खाद्यावर होतो. याच ठिकाणी तुमच्या कॉर्पोरेट ज्ञानाचा खरा कस लागतो.

- **हंगामी खरेदी:** जेव्हा मका, सोयाबीन किंवा हिरवा चारा बाजारात सर्वात स्वस्त असतो, तेव्हा 'डेटा ॲनालिटिक्स'चा वापर करून बाजाराचा कल ओळखा आणि वर्षभराचा कच्चा माल एकदम खरेदी करा.
- **इन्व्हेंटरी मॅनेजमेंट:** रोज महागडा चारा विकत घेण्याऐवजी, कॉर्पोरेट 'वेअरहाऊसिंग'च्या धर्तीवर मुरघास बनवून साठवणूक करा.
- **लॉजिस्टिक कॉस्ट:** वाहतुकीचा खर्च कसा वाचवता येईल आणि थेट शेतकऱ्यांच्या बांधावरून कच्चा माल कसा उचलता येईल, यासाठी तुमची वाटाघाटीची कौशल्ये वापरा.

**2. एच.आर. मॅनेजमेंट : मजुरांचे स्मार्ट नियोजन**

गोठ्यातील मजुरांचा प्रश्न हा केवळ पैशांचा नसून, तो 'पीपल मॅनेजमेंट'चा आहे.

- **एस.ओ.पी.:** कॉर्पोरेट कंपन्यांप्रमाणे गोठ्यातही कामाचे निश्चित नियम बनवा. धारा काढण्याची वेळ, सड धुण्याची पद्धत व चारा टाकण्याचे मोजमाप याचे तक्ते तयार करून मजुरांना प्रशिक्षण द्या.
- **कामगिरीवर आधारित बोनस :** मजुरांना केवळ पगार न देता 'इन्सेन्टिव्ह' मॉडेल लागू करा. उदा. "या महिन्यात गोठ्यात मस्टायटीसचा एकही केस आला नाही, तर 500 रुपये अतिरिक्त बोनस." यामुळे मजूर अधिक जबाबदारीने आणि लक्ष देऊन काम करतात.
- **व्यावसायिक संस्कृती:** गोठ्यात मजुरांना कामगारासारखी नव्हे, तर टीमचा एक भाग असल्याची वागणूक द्या, ज्यामुळे ते वारंवार काम सोडून जाणार नाहीत.

**3. मार्केटिंग आणि ब्रँडिंग**

तुम्ही तयार केलेले दर्जेदार दूध केवळ डेअरीच्या संकलन केंद्रावर होलसेल भावात विकण्यासाठी तुमची 'एमबीए'ची पदवी नाही!

- **व्हॅल्यू एडिशन :** दुधाची थेट विक्री करण्याऐवजी त्याचा प्रीमियम ब्रँड तयार करा. ग्राहकांना तुमच्या दुधाची शुद्धता, पॅकेजिंग आणि 'Farm to Home' (गोठा ते थेट घर) संकल्पना समजावून सांगा.
- **डी-टू-सी मॉडेल :** शहरी भागात शुद्ध दुधाची प्रचंड मागणी आहे. ग्राहकांचे 'सबस्क्रिप्शन मॉडेल' तयार करून दुधाची ॲडव्हान्स बुकिंग घ्या.
- **डिजिटल मार्केटिंग :** सोशल मीडियाचा वापर करून तुमच्या गोठ्याची स्वच्छता, मुक्त संचार पद्धत आणि जनावरांची काळजी घेण्याचे व्हिडिओ ग्राहकांपर्यंत पोहोचवा. हा 'ट्रस्ट फॅक्टर' तुम्हाला बाजारापेक्षा 10-15 रुपये जास्तीचा प्रीमियम दर मिळवून देईल.

थोडक्यात सांगायचे तर, 'एमबीए'च्या ज्ञानाचा उपयोग गाईकडून जास्त दूध पिळण्यासाठी नाही, तर **उत्पादन खर्च कमी करण्यासाठी व विक्री मूल्य वाढवण्यासाठी** करायचा असतो!

*(पुढील भागात आपण पाहणार आहोत: 'खाणारी मालमत्ता - गोठ्यातला माल विकला नाही, तर तो खिशातले पैसे खातो!' नक्की वाचा.)*

# एथ्नोव्हेटकॉन-2026 परिषदेत पुणे रोग अन्वेषण विभागाचा सहभाग

नागपूर पशुवैद्यकीय महाविद्यालय (माफसू) व 'इंडियन सोसायटी फॉर एथ्नो व्हेटर्नरी हर्बल रिसर्च' यांच्या संयुक्त विद्यमाने 20 व 21 ऑगस्ट 2026 रोजी नागपूर येथे 'ETHNOVETCON-2026' ही राष्ट्रीय परिषद पार पडली. या परिषदेत पुणे रोग अन्वेषण विभागाचे डॉ. अनिल देशपांडे (उपायुक्त) व डॉ. परमेश्वर परिहार (पशुवैद्यकीय अधिकारी) यांनी सहभाग घेतला.

परिषदेचा मुख्य विषय '*Integrating the Ethno-Veterinary Herbal Research across Livestock, Poultry and Pet Animals in the Era of One Health*' असा होता. यात पारंपरिक पशुवैद्यक, औषधी वनस्पती व आधुनिक विज्ञानाचा समन्वय साधण्यावर भर देण्यात आला. पद्मश्री डॉ. एन. पुन्नियामूर्ती यांनी सेंद्रिय शेती, शेण-गोमूत्राचा योग्य वापर व प्रतिजैविकांना पर्याय म्हणून 'Ethno-Veterinary Medicine' (EVM) चा पूरक वापर करण्याचे महत्त्व स्पष्ट केले.

NDDB चे डॉ. हरी कुमार यांनी दिलेल्या माहितीनुसार, EVM मुळे पशुआरोग्य समस्यांमध्ये 81% क्युअर रेट मिळाला असून, Diarrhoea, Fever व Mastitis मध्ये 80 ते 84% रिकव्हरी रेट नोंदवला गेला आहे. यामुळे प्रतिजैविकांचा वापर 65% कमी झाला असून उपचारांच्या खर्चात 96% बचत झाली आहे. प्रतिजैविकांच्या अतिवापरामुळे निर्माण होणाऱ्या AMR या जागतिक समस्येवर मात करण्यासाठी विज्ञानावर आधारित EVM चा पूरक वापर व पारंपरिक ज्ञानाचे वैज्ञानिक प्रमाणीकरण आवश्यक आहे. दूध संस्था केवळ संकलनापुरत्या मर्यादित न ठेवता, त्याद्वारे पर्यावरण, प्राणी व मानवाच्या एकात्मिक आरोग्यासाठी 'ॲनिमल हेल्थ सर्व्हेलन्स सिस्टीम' विकसित करण्याचा विचार मांडण्यात आला.

पुणे रोग अन्वेषण विभागासाठी या परिषदेतील ज्ञान अत्यंत उपयुक्त ठरणार असून, भविष्यात शाश्वत पशुआरोग्य, पर्यावरणपूरक उपचार, व प्रतिजैविकांचा नियंत्रित वापर यासाठी आधुनिक रोगनिदान व पारंपरिक वैद्यकशास्त्राचा समन्वय साधण्यास मदत होईल.

# राष्ट्रीय पशुधन अभियानांतर्गत 'आयुष गोट फार्म' ची संयुक्त पाहणी

नांदेड : राष्ट्रीय पशुधन अभियान योजनेअंतर्गत लघु रवंथी पशुधन (शेळी/मेंढी) उद्योजकता विकास प्रकल्प म्हणून मंजूर असलेल्या आयुष गोट फार्म, पिंपरखेड, ता. हदगाव, जि. नांदेड या प्रकल्पास 31 ऑगस्ट 2026 रोजी पशुसंवर्धन विभागाच्या अधिकाऱ्यांनी भेट देत पाहणी केली. सदर प्रकल्पाचे प्रोप्रायटर डॉ. परसराम जळबाजी साखरे (पाटील) असून, प्रकल्प सर्वे नं. 117 येथे कार्यान्वित आहे. प्रकल्पाची एकूण किंमत ₹99,83,500/- असून, नोंदणी क्रमांक N.L.M.20220422000041 आहे.

या भेटीवेळी डॉ. सखाराम खुणे, जिल्हा उपआयुक्त, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, नांदेड; डॉ. प्रविणकुमार घुले, सहाय्यक आयुक्त, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, नांदेड; डॉ. दत्तात्रय शिंदे, सहाय्यक आयुक्त, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, हदगाव, तसेच हदगाव तालुक्यातील पशुवैद्यकीय अधिकारी, पशुधन पर्यवेक्षक, परिचर व सेवादाता उपस्थित होते. संयुक्त पथकाने प्रकल्पाची सविस्तर तपासणी करून प्रकल्पाच्या शेडवर उपलब्ध असलेल्या विविध पायाभूत सुविधा व व्यवस्थापनाची प्रत्यक्ष पाहणी केली. तसेच प्रकल्पस्थळी उपलब्ध असलेल्या पशुधनाची टॅगनिहाय प्रत्यक्ष पडताळणी करण्यात आली. या पाहणीदरम्यान प्रकल्पाची सद्यस्थिती, उपलब्ध पशुधन, शेडमधील सुविधा व प्रकल्पाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीचा आढावा घेण्यात आला.






# जळगाव : एफएमडी 9 व्या फेरीची तपासणी



जळगाव : जिल्ह्यात राष्ट्रीय रोगनियंत्रण कार्यक्रमांतर्गत सुरू असलेल्या लाळखुरकूत रोग प्रतिबंधक लसीकरणाच्या 9 व्या फेरीची तपासणी व तांत्रिक संनियंत्रण करण्यासाठी पुणे येथील रोग अन्वेषण विभागाचे उपायुक्त डॉ. सुनील लहाने यांनी जिल्ह्यातील आर. सी. बाफना गोसेवा अनुसंधान केंद्र, कुसुंबा येथे भेट दिली. यावेळी काही जनावरांना लाळखुरकूत रोगप्रतिबंधक लस देत लसीकरण मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. यानंतर जिल्ह्यातील काही पशुचिकित्सालयांना भेट देऊन लसीकरण मोहिमेचा आढावा घेण्यात आला. NDLM प्रणालीमध्ये पशुपालकांच्या मोबाईलवर प्राप्त होणाऱ्या OTP च्या आधारे लसीकरणाच्या नोंदी अचूकपणे करण्यात येत आहेत की नाही, याचीही त्यांनी खात्री केली. या प्रसंगी जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. प्रदीप झोड यांच्यासह पशुसंवर्धन विभागातील वरिष्ठ अधिकारी, पशुवैद्यकीय अधिकारी, कर्मचारी तसेच पशुपालक उपस्थित होते.

# सेंद्रिय कार्बन वाढ व दुग्ध व्यवसायाला चालना देण्यासाठी जिंतूर येथे भव्य पशुपालक प्रशिक्षण वर्ग, 1,000 हून अधिक शेतकऱ्यांची उपस्थिती

**जिंतूर (परभणी):** पशुपालनाच्या माध्यमातून जमिनीतील सेंद्रिय कार्बनचे प्रमाण वाढवणे, विदर्भ व मराठवाडा दुग्धविकास योजनेची प्रभावी अंमलबजावणी करणे आणि उच्च अनुवंशिकतेच्या HGM कालवडींच्या संगोपनाला गती देणे, या उद्देशाने दिनांक 11 ऑगस्ट 2026 रोजी जिंतूर येथे पशुसंवर्धन विभागातर्फे एक दिवसीय भव्य पशुपालक व दुग्ध उत्पादक प्रशिक्षण वर्गाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला जिंतूर परिसर व तालुक्यातील 1000 पेक्षा अधिक पशुपालकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदवला.

प्रशिक्षण वर्गादरम्यान तज्ज्ञांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की, शाश्वत शेतीसाठी शेतात सेंद्रिय कार्बन वाढवणे आवश्यक असून, ते पशुपालनाद्वारे सहज शक्य आहे. तसेच विदर्भ व मराठवाडा दुग्धविकास प्रकल्पांतर्गत मिळणाऱ्या विविध शासकीय योजना व सवलतींची इत्यंभूत माहिती या वेळी शेतकरी व दूध उत्पादकांना देण्यात आली.

**HGM कालवडी संगोपन व अर्ज करण्याचे आवाहन:**

उच्च दुग्ध उत्पादन क्षमता असलेल्या HGM (High Genetic Merit) कालवडींच्या संगोपनाबाबत उपस्थित अधिकाऱ्यांनी सविस्तर तांत्रिक माहिती दिली. या घटकाचा लाभ घेऊन दुग्ध व्यवसाय अधिक फायदेशीर बनवण्यासाठी पशुपालकांनी जास्तीत जास्त संख्येने अर्ज करावेत, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले.

**बीएमसी केंद्र पाहणी व सर्व्हेचा आढावा:**

याप्रसंगी जिंतूर तालुक्यातील सर्व्हेक्षणासाठी निवडलेल्या गावांबाबत पशुपालकांना माहिती देण्यात आली. तसेच प्रस्तावित जिंतूर शहर आणि बोरी गाव येथील बल्क मिल्क कुलर केंद्रांच्या जागेची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. ज्या भागांत सर्व्हेचे काम अद्याप सुरू झालेले नाही, तेथे नवीन प्रगणकांची नियुक्ती करून सर्व्हे गतिमान करण्याचे निर्देश टीम लीडर श्री. पटेल यांना देण्यात आले. या प्रशिक्षण शिबिरास जिंतूरचे सहाय्यक आयुक्त डॉ. कनले, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. माजेद, डॉ. रापतवार, डॉ. नंदनवरे यांच्यासह पशुसंवर्धन विभागातील कर्मचारी व परिसरातील शेतकरी-पशुपालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**कुंभारी (ता. जत, सांगली):** येथे पशुपालकांसाठी विशेष मार्गदर्शन कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेला भागातील तब्बल 650 पशुपालकांनी उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदवला.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान सांगली जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन व दुग्धशाळा समितीच्या सभापती सावित्री तम्मनगौडा रविपाटील यांनी भूषवले. त्यांच्या प्रमुख उपस्थितीत दुग्ध व्यवसाय, पशुआहार व्यवस्थापन, सॉर्टेड सीमेनचा वापर व आधुनिक गोठा व्यवस्थापन या महत्त्वाच्या विषयांवर पशुपालकांना सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

या प्रसंगी जत पंचायत समितीच्या सभापती अर्चना नाथा पाटील, माजी सभापती तम्मनगौडा रवि पाटील, अकाराम मासळ, तसेच जिल्हा परिषद सदस्य डॉ. शिवाजी खिलारे यांची प्रमुख उपस्थिती होती.

याशिवाय सांगली जिल्ह्याचे पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय उपायुक्त डॉ. अजय थोरे, सहाय्यक आयुक्त डॉ. श्रीकांत सुर्वे, डॉ. राजीव चंदनशिवे, डॉ. बाबासाहेब गुंजाटे आणि कुंभारी पशुचिकित्सालयाचे डॉ. सुहास सलगर या तज्ज्ञ अधिकाऱ्यांनी उपस्थित राहून पशुपालकांना मार्गदर्शन केले.








पशुसंवर्धन विभागाच्या तालुका पशुवैद्यकीय चिकित्सालय शिराळा (जि. सांगली) द्वारे नागपंचमीच्या पार्श्वभूमीवर 41 नागांची आरोग्य तपासणी करून त्यांना आरोग्यदाखले देण्यात आले

नागपंचमीच्या काळात परंपरेनुसार पूजल्या जाणाऱ्या नागांची आरोग्य स्थिती उत्तम असल्याची खात्री करण्यासाठी ही विशेष तपासणी मोहीम राबवण्यात आली. यामध्ये 41 नागांची सखोल वैद्यकीय तपासणी करून पशुसंवर्धन विभागातर्फे अधिकृत आरोग्यदाखले जारी करण्यात आले.

नागपंचमीला वन्यजीवांची सुरक्षितता जपली जावी व नागांचे कोणतेही हाल किंवा शोषणाविना धार्मिक परंपरा पाळल्या जाव्यात, या उद्देशाने पशुसंवर्धन विभागाने ही तत्परता दाखवली. पशुसंवर्धन विभागाच्या शिराळा येथील या उपक्रमामुळे वन्यजीव संरक्षण कायदे व लोकपरंपरा यांचा समतोल राखण्यास मदत झाली आहे.

# अमरावती विभागात सर्व TAHO यांची तांत्रिक कार्य आढावा व VMDDP मार्गदर्शन बैठक



**अमरावती:** दि. 12 ऑगस्ट 2026 रोजी जिल्हा परिषद सभागृह, अमरावती येथे अमरावती विभागांतर्गत येणाऱ्या सर्व तालुका पशुसंवर्धन अधिकारी (TAHO) यांची तांत्रिक कार्य आढावा बैठक पार पडली. या बैठकीस विभागातील सर्व जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त (DDCAH) व तालुका पशुसंवर्धन अधिकारी उपस्थित होते.

बैठकीच्या पहिल्या सत्रात अमरावती विभागातील पशुसंवर्धनविषयक तांत्रिक कामकाजाचा, योजनांच्या अंमलबजावणीचा व क्षेत्रीय पातळीवरील कामकाजाचा सविस्तर आढावा वरिष्ठांकडून घेण्यात आला.

बैठकीच्या दुसऱ्या टप्प्यात 'विदर्भ व मराठवाडा दुग्धविकास प्रकल्प' (VMDDP) अंतर्गत घटकनिहाय आढावा घेण्यात आला. यावेळी योजना अंमलबजावणीतील अडचणींचे निराकरण करून सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

**उद्दिष्टपूर्तीचे दिशा-निर्देश:**

VMDDP अंतर्गत निश्चित केलेले उद्दिष्ट कालमर्यादित कसे पूर्ण करावेत, याविषयी डॉ. पाटील, डॉ. गोराणी व डॉ. वंजारी यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना स्पष्ट दिशा-निर्देश दिले. या महत्त्वपूर्ण आढावा बैठकीस अमरावती विभागातील सर्व जिल्ह्यांचे DDCAH व TAHO अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.








प्रकाशक: पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य

# उमरी येथे पशुपालक प्रशिक्षण कार्यक्रम उत्साहात; पशुपालकांचा मोठा सहभाग



**उमरी (नांदेड) :** येथील तहसील कार्यालय परिसरातील सभागृहात पशुपालकांसाठी विशेष प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी तालुक्यातील पशुपालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उमरी तालुका व परिसरातील शेतकरी आणि पशुपालकांनी प्रशिक्षणात सक्रिय सहभाग नोंदवला. पशुपालन, आधुनिक संगोपन पद्धती, पशुआरोग्य व व्यवस्थापन या विषयांवर तज्ज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात आले. पशुसंवर्धन विभागाच्या विविध योजना, सुधारित पैदास व पूरक व्यवसायाबाबत पशुपालकांना सविस्तर माहिती देण्यात आली. प्रशिक्षणादरम्यान उपस्थितांनी विचारलेल्या प्रश्नांचे व शंकांचे तज्ज्ञांकडून निरसन करण्यात आले.

# रांझणी गोशाळेत एफएमडी प्रतिबंधक लसीकरणाचे आयोजन

## जंतनिर्मूलनासह 100% अनुदानावर चारा बियाणे वाटप

**प्रतापपूर (नंदुरबार):** पशुवैद्यकीय चिकित्सालय प्रतापपूर अंतर्गत आईसाहेब जिजाऊ गोशाळा, रांजणी येथे विशेष पशु आरोग्य व चारा विकास उपक्रम राबवण्यात आला. यावेळी गोशाळेतील गाईंना लाळ खुरकूत (एफएमडी) प्रतिबंधात्मक लस देण्यात आली, तसेच जंतनिर्मूलन मोहीम राबवण्यात आली.

नंदुरबार जिल्हा उपआयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) डॉ. संजय खाचणे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला. या प्रसंगी सहाय्यक आयुक्त डॉ. अरुण महाकाळ यांच्या हस्ते गोशाळा चालकांना 100% अनुदानावर मका व शुगर ग्रेज या उच्च दर्जाच्या चारा बियाण्यांचे वाटप करण्यात आले. गोशाळेतील पशुधनाला पुरेसा हिरवा चारा उपलब्ध व्हावा व त्यांचे आरोग्य उत्तम राहावे, या हेतूने हे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास संस्थाप्रमुख डॉ. शुभांगी शिंदे व व्रणोपचारक श्री. गणेश धनगर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. गोशाळा व्यवस्थापनाने या उपक्रमाबद्दल पशुसंवर्धन विभागाचे आभार मानले.





# सेवा संपली, नातं नाही

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोलीस दलात 10 वर्षे सेवा बजावणाऱ्या पोलीस श्वानांबाबत संवेदनशील निर्णय घेतला आहे. सेवेतून निवृत्त झाल्यानंतरही या श्वानांना पोलीस दलासोबतच ठेवण्यात येणार आहे. सेवेदरम्यान श्वान आणि त्यांच्या रखवालदारांमध्ये विश्वास, जिव्हाळा आणि घट्ट नाते निर्माण होते. मात्र, निवृत्तीनंतर इतरत्र दत्तक दिल्याने अनेकदा त्यांच्या मानसिक स्वास्थ्यावर परिणाम होऊन ते अन्नत्याग करतात. त्यामुळे सेवा बजावलेल्या या श्वानांची काळजी घेणे ही आपलीच जबाबदारी असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या या निर्णयानंतर आता पोलीस श्वान निवृत्तीनंतरही पोलीस दलासोबतच राहणार असून, त्यांच्या रखवालदारांसोबतचे ऋणानुबंध कायम राहतील आणि त्यांचे उर्वरित आयुष्य सुखकर होईल. त्यांच्या भोजन व देखभालीचा आवश्यक खर्च गृह विभागाकडून केला जाईल. पोलीस दलातून या निर्णयाचे स्वागत करण्यात येत आहे.

# हिंगोली येथे आधुनिक शेळीपालन व कुक्कुट व्यवस्थापन प्रशिक्षण



हिंगोली : शेतकरी भवन, वंजारवाडा येथे आधुनिक शेळीपालन व कुक्कुट व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. या प्रशिक्षण कार्यक्रमास मार्गदर्शक म्हणून आमदार संतोष बांगर, डॉ. बुचाले, उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय डॉ. कल्ल्यापुरे, सहाय्यक आयुक्त, डॉ. रहीम व डॉ.राठोड सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, डॉ. संतोष पठाडे तालुका पशुसंवर्धन अधिकारी यांनी व त्यांचे अधिकारी व कर्मचारी यांनी प्रशिक्षणाचे आयोजन केले तसेच पशुवैद्यकीय महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. निकम, प्रा. खरवडकर व प्रा. भुक्तार, तसेच IVRI, पुणे येथील शास्त्रज्ञ बहिरे सर यांची प्रमुख उपस्थिती व मार्गदर्शन लाभले. या प्रशिक्षण कार्यक्रमास सुमारे 350 प्रशिक्षणार्थींनी उत्स्फूर्तपणे उपस्थित राहून प्रशिक्षणाचा लाभ घेतला. उपस्थित मान्यवरांनी प्रशिक्षणार्थींना मा. मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजक्ता योजना विषयांबाबत प्रसिद्धी व प्रचार करून मार्गदर्शन केले. मान्यवरांचे मार्गदर्शन व प्रशिक्षणार्थींचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे हा प्रशिक्षण कार्यक्रम अत्यंत उपयुक्त व यशस्वी ठरला.

# क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालयात अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांना शेळी व बोकड वाटप




**शिरवळ (सातारा) :** क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ येथे ICAR-राष्ट्रीय उच्च सुरक्षा पशु रोग संस्था (भोपाल, मध्यप्रदेश) अंतर्गत अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांच्या शाश्वत उपजीविकेसाठी शेळीपालन प्रकल्पाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात लोणंद व खंडाळा तालुक्यातील एकूण 20 लाभार्थ्यांना 40 शेळ्या व 4 बोकडांचे वाटप करण्यात आले.

ग्रामीण भागातील अनुसूचित जातीच्या कुटुंबांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे व शेळीपालनाच्या माध्यमातून त्यांना रोजगाराची शाश्वत संधी उपलब्ध करून देणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

या प्रसंगी महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ (MAFSU), नागपूरचे कुलगुरू मा. डॉ. नितीन पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांच्यासोबत डॉ. नितीन कुरकुरे (संशोधन संचालक, MAFSU, नागपूर), डॉ. विकास वासकर (सहयोगी अधिष्ठाता, पशुवैद्यकीय महाविद्यालय शिरवळ), डॉ. गजेंद्र खांडेकर, प्रा. प्रशांत पवार, डॉ. तेजस शेंडे, डॉ. विठ्ठल धायगुडे व महाविद्यालयातील इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

उपस्थित मान्यवर व तज्ज्ञांनी लाभार्थ्यांना शेळीपालनाचे आधुनिक व्यवस्थापन, लसीकरण व आरोग्यविषयक काळजी याबद्दल मार्गदर्शन केले. या उपक्रमामुळे लाभार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण दिसून आले.







# नागपूर विभागात दुग्ध उत्पादकता वाढीसाठी 'कॅल्क्युलेटेड एआय' उपक्रमाचा शुभारंभ



**नागपूर:** विभागामध्ये पशुपालकांचे उत्पन्न वाढवण्यासाठी व दुग्ध व्यवसाय अधिक फायदेशीर करण्यासाठी 1 सप्टेंबर 2026 पासून 'कॅल्क्युलेटेड एआय – नागपूर विभाग नियोजनबद्ध पैदास व दुग्ध उत्पादकता सुधारणा कार्यक्रम' यशस्वीरीत्या सुरू करण्यात आला आहे. नागपूर विभागातील सर्व 63 तालुक्यांमधील प्रत्येकी एका निवडक गावात हा उपक्रम राबवला जात आहे. या अभियानांतर्गत 63 गावांधील सुमारे 6,300 गाई व म्हशींवर विशेष उपचार व कृत्रिम रेतन केले जाईल.

**उपक्रमाची प्रमुख वैशिष्ट्ये:**

- गाभण न राहणे, वारंवार उलटणे, माजावर न येणे व गुप्त माज यांसारख्या पुनरुत्पादन समस्यांचे अचूक निदान व उपचार.
- पशुवैद्यकीय तपासणीनंतर पात्र जनावरांना GPG (Gonadotropin-Releasing Hormone & Prostaglandin) प्रोटोकॉल खाली आणून नियोजित कृत्रिम रेतन केले जाईल.
- जनावरांच्या आरोग्यानुसार व डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार सेक्स-सॉर्टेड व पारंपरिक सिमेनचा योग्य वापर.
- तपासणी, उपचार, जीपीजी प्रोटोकॉल, कृत्रिम रेतन, नियमित पाठपुरावा व गर्भनिदान अशा टप्प्यांद्वारे उत्पादकता वाढवण्यावर भर.

केवळ जनावरांची संख्या वाढवण्यापेक्षा उपलब्ध पशुधनाची प्रजनन क्षमता व दुग्ध उत्पादकता वाढवणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. यामुळे दुग्ध व्यवसाय अधिक शाश्वत व शेतकऱ्यांसाठी आर्थिकदृष्ट्या फायदेशीर ठरेल.

**क्षेत्रीय पथकांचे कौतुक:** एकाच वेळी 63 तालुक्यांमध्ये हा उपक्रम राबवणे आव्हानात्मक असले, तरी पशुवैद्यकीय अधिकारी, पशुधन विकास अधिकारी, पॅरावेट्स, एआय तंत्रज्ञ व इतर कर्मचारी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत व समर्पणाने काम करत आहेत. या सर्व पथकांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे नागपूर विभागात 'कॅल्क्युलेटेड एआय'चा हा पॅटर्न नक्कीच यशस्वी ठरेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.



**प्रकाशक:** पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य


महापशुधन वार्ता

नांदेड: राष्ट्रीय पशुधन अभियान (NATIONAL LIVESTOCK MISSION) योजनेअंतर्गत महेश्वर शीप फार्म (मेंढीपालन प्रकल्प) लाभार्थींचे नाव : माधव बालाजी शिळे, पत्ता : मु. पो. बारूळ, ता. कंधार, जि. नांदेड येथे 26 ऑगस्ट 2026 रोजी जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय डॉ. सखाराम खुणे, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय डॉ. प्रवीणकुमार घुले व पशुवैद्यकीय अधिकारी, पशुचिकित्सालय, माळेगाव ता. लोहा यांनी भेट देऊन पाहाणी केली व उर्वरित कालावधीत प्रकल्प पुर्ण करण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले.





# हयापूर सर्फबाद येथे वंधत्व निवारण व पशुचिकित्सा शिबिर संपन्न

अमरावती: पशुवैद्यकीय चिकित्सालय कोकर्डा (पंचायत समिती, अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती) च्या वतीने 25 ऑगस्ट 2026 रोजी हयापूर सर्फबाद येथे भव्य वंधत्व निवारण व सर्वोपचार शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या शिबिरात 38 पशुपालकांनी सहभाग नोंदवला असून एकूण 171 जनावरांवर विविध उपचार करण्यात आले.

सहाय्यक आयुक्त डॉ. दीपक रणदिवे यांच्या मार्गदर्शनाखाली या शिबिरात डॉ. आदेश चोपळे (पशुधन विकास अधिकारी, धनेगाव) व डॉ. रोशन वेरूळकर (पशुधन विकास अधिकारी, पथ्रोट) या तज्ज्ञ डॉक्टरांनी पशुधनावर उपचार केले. शिबिर यशस्वी करण्यासाठी श्री. रविकिरण सोनार (प. वि. अ., अंजनगाव सुर्जी), श्री. अनिल लोखंडे (सहाय्यक प. वि. अ., कोकर्डा) तसेच सेवादाते गौरव काकड, दीपक ढगेकर व साहिल ढोके यांनी विशेष परिश्रम घेतले.

**शिबिरातील उपचार व कामांचा तपशील:**

- लंपी/एफएमडी (FMD) लसीकरण: 195
- औषधोपचार: 60
- जंतनाशक औषधी वाटप: 40
- गोचीड निर्मूलन: 30
- नमुने तपासणी: 20
- वंधत्व निवारण उपचार: 15
- गर्भधारणा तपासणी (गाय/म्हैस): 11
- लहान शस्त्रक्रिया: 05
- खच्चीकरण: 05








मी डी. फार्मसी शिक्षण घेतल्यानंतर एका खाजगी कंपनीत चार वर्षे काम केले. मात्र, त्यानंतर नोकरी सोडून मी गावाकडे येऊन कुक्कुटपालन करण्याचा निर्णय घेतला. आम्ही पूर्वी भाजीपाला उत्पादन घेत होतो. त्यानंतर बाहेरून खत घेण्याऐवजी आपणच कोंबडीपालन व्यवसाय करून खताची गरज भागवू शकतो, या उद्देशाने शेतीसोबत पोल्ट्री व्यवसायाकडे वळण्याचा मार्ग निवडला. शेतीच्या उत्पन्नातून थोड्याफार रकमेची तजवीज केली. परंतु, खर्च अधिक असल्याने शेती तारण देत बँकेकडून 40 लाख रुपयांचे कर्ज घेऊन व्यवसाय सुरु केला. सुरुवातीला अनेक अडचणी आल्या होत्या. परंतु, हार न मानता व जिद्द कायम बाळगत हा व्यवसाय वाढवला. आजमितीस माझ्याकडे 21 हजार बॉयलर पक्ष्यांचा फार्म आहे. आता हा व्यवसाय मुख्य व्यवसाय बनला असून, शाश्वत उत्पन्नाचा मार्ग सुकर झाला आहे.

सुरुवातीला 'बारामती ॲग्रो' कंपनीसोबत करार करून 35 ते 45 दिवसांचे ब्रॉयलर पक्षी संगोपनाचे काम सुरु झाले. 'पवार पोल्ट्री फार्म' या नावाने स्वतःचा स्वतंत्र व्यवसाय उभारण्यात आला. पक्ष्यांच्या आरोग्यासाठी शुद्ध पाणी अत्यंत महत्त्वाचे असते. यासाठी बोअरवेलचे पाणी प्रयोगशाळेत तपासून त्याचा TDS व हार्डनेस नियंत्रित ठेवण्यासाठी फिल्टर सिस्टीम बसवण्यात आली आहे. शेडमधील चार टाक्यांद्वारे पक्षांना थेट जागेवरच पाणी मिळावे म्हणून 'ऑटोमॅटिक निप्पल सिस्टीम'चा वापर केला जातो.

**वार्षिक उलाढाल व नफा**

•वर्षाला 21,000 पक्षांचे तब्बल 6 लॉट घेतले जातात.

•वाहतूक, खाद्य, मजूर, वीज व डिझेल असा प्रती लॉट सुमारे 1 लाख 60 हजार रुपये खर्च येतो. सर्व खर्च वजा जाता प्रती लॉट 7 ते 8 लाख रुपयांचे उत्पन्न मिळते.

•**खत विक्री:** कोंबड खताला स्थानिक शेतकऱ्यांकडून मोठी मागणी असून, त्यातून वर्षाला जवळपास 7 लाख रुपयांचे अतिरिक्त उत्पन्न मिळते. काही खताचा वापर स्वतःच्या शेतीसाठीही केला जातो.



सदरील पोल्ट्री फार्म उभा करत असताना येणाऱ्या प्रत्येक तांत्रिक बाबी विषयीचे सखोल मार्गदर्शन पशुसंवर्धन विभाग ,पंचायत समिती ,दौंड येथील अधिकारी डॉ. अंजली दळवी मॅडम व डॉ. शांतीलाल आटोळे, पशुवैद्यकीय अधिकारी यांचे वेळोवेळी मार्गदर्शन मिळाल्यामुळे व्यवसायात तोटा कमी होऊन अधिकचे उत्पन्न मिळू लागले.



हिंगोली: शेतकरी भवन वंजारवाडा येथे आधुनिक शेळीपालन व कुक्कुट व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. या प्रशिक्षण कार्यक्रमास मार्गदर्शक म्हणून आमदार संतोष बांगर, डॉ. बुचाले, उपआयुक्त, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, डॉ. कल्ल्यापुरे, सहाय्यक आयुक्त, डॉ. रहीम व डॉ. राठोड सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, डॉ. संतोष पठाडे तालुका पशुसंवर्धन अधिकारी यांनी व त्यांचे अधिकारी व कर्मचारी यांनी प्रशिक्षणाचे आयोजन केले. तसेच पशुवैद्यकीय महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. निकम, प्रा. खरवडकर व प्रा. भुक्तार, तसेच IVRI, पुणे येथील शास्त्रज्ञ बहिरे यांची प्रमुख उपस्थिती व मार्गदर्शन लाभले. या प्रशिक्षण कार्यक्रमास सुमारे 350 प्रशिक्षणार्थींनी उत्स्फूर्तपणे उपस्थित राहून प्रशिक्षणाचा लाभ घेतला. उपस्थित मान्यवरांनी प्रशिक्षणार्थींना मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजक्ता योजना विषयांबाबत प्रसिद्धी व प्रचार करून मार्गदर्शन केले. मान्यवरांचे मार्गदर्शन व प्रशिक्षणार्थींचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे हा प्रशिक्षण कार्यक्रम अत्यंत उपयुक्त व यशस्वी ठरला.

# ‘युटेराईन टॉर्शन’वर यशस्वी उपचार

**नांदगाव पेठ:** महसुली जहागीर पशुवैद्यकीय दवाखान्याअंतर्गत येणाऱ्या धामणा येथील शेतकरी श्री. केशव ठाकरे यांच्या म्हशीला युटेराईन टॉर्शन या गंभीर आजाराचा त्रास होत होता. तिच्या गर्भाशयाला उजव्या बाजूने पीळ पडला होता. या गंभीर परिस्थितीत म्हशीला तातडीने नांदगाव पेठ येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात उपचारासाठी दाखल करण्यात आले.

नांदगाव पेठ पशुवैद्यकीय दवाखान्याचे पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. डी. एन. हटकर यांनी आपल्या पशुवैद्यकीय कौशल्याचा वापर करत 'लाकडी फळी' (पाटी) तंत्राचा (Wooden Plank Technique) प्रभावी वापर करत गर्भाशयाचा पीळ यशस्वीरीत्या काढून गर्भाशय पुन्हा पूर्वस्थितीत आणण्यात यश मिळवले. डॉ. हटकर यांच्या या यशस्वी कामगिरीचे शेतकरी व स्थानिक नागरिकांमधून कौतुक होत आहे.












**पशुपालकांसाठी सुवर्णसंधी!** पाणी फाउंडेशन आणि माफसू, नागपूर यांच्या सहकार्याने सुरु झालेल्या ऑनलाइन डिजिटल पशुधन शाळेचा लाभ घ्या!✅ पशुपालनातील आधुनिक तंत्रज्ञान✅ पशुखाद्य व्यवस्थापन✅ पशूंचे आरोग्य व रोगप्रतिबंधक उपाय✅ दूध उत्पादन वाढीसाठी मार्गदर्शन✅ तज्ज्ञांकडून थेट माहिती🗓️ प्रत्येक शनिवारी सायं. 7.30 वाजता🔗 लिंक: (http://cutt.ly/ssdairy) 🆔 ID: 86917368716🔑 Passcode: 985517 पशुपालक, शेतकरी, महिला बचतगट आणि पशुसंवर्धन क्षेत्राशी संबंधित सर्वांनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा.

# अहिल्यानगर : एफएमडी - 9 फेरी लसीकरण कार्यक्रम पाहणी





**अहिल्यानगर:** जिल्ह्यातील एफएमडी सीपी - 9 व्या फेरीअंतर्गत जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय अहिल्यानगर, तालुका लघु पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय पाथर्डी, आणि पशुवैद्यकीय चिकित्सालय पिंपळगाव (लांडगा) व त्यांच्या कार्यक्षेत्रातील गावांमध्ये सुरू असलेल्या लसीकरण मोहिमेची सहआयुक्त पशुसंवर्धन (मुख्यालय) डॉ. शैलेश केंडे यांच्या मार्गदर्शनाखालील पथकाने क्षेत्रीय स्तरावर पाहणी केली. लसीकरण मोहिमेच्या पाहणीदरम्यान लस साठा, तिचे वाटप व दैनंदिन वापराच्या नोंदी अत्यंत अद्यावत आणि पद्धतशीर आढळल्या, तसेच बीबीए (BBA) नोंदणीकृत खासगी प्रॅाव्हेट कर्मचाऱ्यांना नियुक्त करून अपुऱ्या मनुष्यबळावर मात करत उत्तम सांघिक समन्वयाने काम केले जात असल्याचे दिसून आले. या मोहिमेत सिरिंजेस व नीडल्सचा पुरेसा साठा उपलब्ध असून, संसर्ग टाळण्यासाठी प्रत्येक जनावरासाठी स्वतंत्र नीडल वापरण्यावर भर दिला जात आहे, तर टॅग्ज वेळेवर उपलब्ध असल्याने नोंदी सुलभ होत आहेत.

# ताथवडे पशुपैदास प्रक्षेत्रात 50 हजार लिटर क्षमतेचे 'स्वयंचलित जीवामृत निर्मिती युनिट'चे बांधकाम सुरू

पशुसंवर्धन आयुक्तालय, पुणे-67

महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, नागपूरच्या माध्यमातून शासकीय पशुपैदास प्रक्षेत्र, ताथवडे (जि. पुणे) येथे 50 हजार लिटर क्षमतेच्या स्वयंचलित जीवामृत निर्मिती युनिटचे काम प्रत्यक्ष सुरू झाले आहे. मा. सचिव (पदुम) डॉ. रामास्वामी एन. यांच्या प्रक्षेत्र भेटीदरम्यान शेण-मूत्राच्या नियोजनाची गरज व्यक्त झाल्यानंतर स्वयंचलित जीवामृत निर्मिती संकल्पना पुढे आली. त्यातूनच सदर युनिटच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात करण्यात आली आहे. तामिळनाडूचे सेंद्रिय शेती तज्ज्ञ संपत कुमार यांचे यासाठी विशेष मार्गदर्शन लाभले.

रासायनिक खतांचा वापर कमी करून शेतीचा उत्पादन खर्च घटवणे व जमिनीची सुपीकता वाढवणे, सेंद्रिय व विषमुक्त चारा उत्पादनातून पशुधनाचे आरोग्य सुधारणे आणि दुधाची गुणवत्ता वाढवणे आदी उद्दिष्ट्ये समोर ठेवून या प्रकल्पाची उभारणी करण्यात येत आहे. महाराष्ट्र पशुधन विकास मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. शितलकुमार मुकणे यांचे मार्गदर्शनाखाली प्रक्षेत्र व्यवस्थापक डॉ. उपेंद्र गायकवाड, पविअ डॉ. अमोल आहेर, वैरण उत्पादन सहाय्यक (बाह्यस्त्रोत) राज घोगरे हे सदर प्रकल्पाचे संनियंत्रण करीत आहेत.

भविष्यात राज्यातील सर्व पशुपैदास प्रक्षेत्रांवर असे युनिट उभारण्यात येणार असून, त्याद्वारे प्रक्षेत्रावर सकस चारा निर्मितीचे उद्दिष्ट साध्य होणार आहे. शिवाय, शेतकरी बांधवांनाही दर्जेदार चारा तसेच चाऱ्याची ठोंबे यांचा पुरवठा करणे शक्य होईल, असा विश्वास आहे.

डॉ. शितलकुमार मुकणे, सीईओ: एमएलडीबी, नागपूर



प्रकल्पाचे संकल्पित चित्र




# रासेगाव येथील गोशाळेत लाळखुरकूत लसीकरण मोहिम संपन्न



अचलपूर तालुक्यातील रासेगाव येथील गोशाळेला प्रादेशिक सहआयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय), अमरावती डॉ. येसुदेव वंजारी यांनी सदिच्छा भेट देऊन पाहणी केली. गोशाळेमध्ये 200 हून अधिक देशी पशुधन असून चारा साठवणुकीची उत्तम व्यवस्था दिसून आली. गोशाळेत बायोगॅस प्रकल्प कार्यान्वित आहे. तसेच विविध आकारांचे गोकाष्ठ तयार करुन त्याद्वारे 20 लाख रुपयांपेक्षा अधिक उत्पन्न मिळवले जात असल्याची माहिती संचालकांनी दिली. पाहणीदरम्यान गोशाळेतील पशुधनाचे लसीकरण करुन त्याची नोंद एनडीएलएम (NDLM) पोर्टलवर घेण्यात आली. पशुसंवर्धन विभाग आणि महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या माध्यमातून आवश्यक पशुवैद्यकीय सेवा व सुविधा उत्तम प्रकारे उपलब्ध होत असल्याचे गोशाळा व्यवस्थापनाने नमूद केले.



प्रकाशक: पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य




**पुणे:** राज्यातील गायी व म्हशींमधील प्रजननाची गुणवत्ता वाढवणे, आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रसार करणे व या क्षेत्रात कार्यरत संस्था, अधिकारी व तंत्रज्ञांच्या उत्कृष्ट कार्याला प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरणातर्फे (MBBRA) 'गोजातीय प्रजनन उत्कृष्टता पुरस्कार 2026-27' (Bovine Breeding Excellence Award 2026-27) प्रदान करण्यात येणार आहेत. पशुसंवर्धन आयुक्त तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ. किरण पाटील (भा.प्र.से) यांनी परिपत्रकाद्वारे या उपक्रमाची घोषणा केली आहे.



### पुरस्कारामागील मुख्य उद्दिष्टे:

1. **सेवा गुणवत्तेचा विकास:** प्राधिकरण स्तरावर व जिल्हा स्तरावर नोंदणीकृत संस्थांना उच्च दर्जाच्या व मानकीकृत प्रजनन सेवा देण्यासाठी प्रोत्साहन देणे.
2. **पारदर्शकता व निरोगी स्पर्धा:** राज्यातील गोजातीय प्रजनन कार्यात गुणवत्ता वाढवणे, पारदर्शकता आणणे व स्पर्धात्मकता निर्माण करणे.
3. **एसओपी:** संस्थांमध्ये Standard Operating Procedure (SOP) चे तंतोतंत पालन व डिजिटल रेकॉर्डिंग पद्धती सुधारणे.
4. **4. उत्कृष्टतेचा सन्मान:** उत्कृष्ट कार्य करणाऱ्या संस्था व व्यक्तींना सन्मानित करून इतरांना प्रेरणा देणे.

### पुरस्कारांची वर्गवारी व क्षेत्र (8 प्रमुख गट):

1. **उत्कृष्ट रेत केंद्र:** सर्वाधिक स्ट्रॉ निर्मिती, सर्वाधिक जोडलेल्या रेत बँका, उच्च कन्सेप्शन दर, CMU ग्रेडेशन व NDLM ऑनलाइन नोंदी. (1 पुरस्कार)
2. **उत्कृष्ट कृत्रिम रेतन सेवा पुरवठाकार:** सर्वाधिक नोंदणीकृत AI तंत्रज्ञ, एकूण एआय संख्या, कन्सेप्शन दर व NDLM नोंदी. (1)
3. **उत्कृष्ट भ्रूण प्रत्यारोपण प्रयोगशाळा:** सर्वाधिक भ्रूण निर्मिती, जन्माला आलेली वासरे, उच्च कन्सेप्शन दर. (1 पुरस्कार)
4. **उत्कृष्ट रेत बँक:** NDLM वर सर्वाधिक AI तंत्रज्ञ नोंदणी, साठवणूक सुविधा (Storage Facility) व अद्ययावत साधने. (प्रथम, द्वितीय, तृतीय - 3 पुरस्कार)
5. **उत्कृष्ट जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय :** जिल्ह्यातील सर्वाधिक कृत्रिम रेतन संख्या, कन्सेप्शन दर व NDLM ऑनलाईन रिपोर्टिंग. (प्रथम, द्वितीय, तृतीय - 3 पुरस्कार)
6. **उत्कृष्ट सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन (बोव्हाईन ब्रीडिंग):** क्षेत्रातील उत्कृष्ट कामकाज, कृत्रिम रेतन संख्या व NDLM मधील कामगिरी. (प्रथम, द्वितीय, तृतीय - 3 पुरस्कार)
7. **उत्कृष्ट नोंदणीकृत कृत्रिम रेतन तंत्रज्ञ :** प्रत्यक्ष क्षेत्रातील कृत्रिम रेतन संख्या, उच्च कन्सेप्शन दर व डिजिटल नोंदी. (प्रथम, द्वितीय, तृतीय - 3 पुरस्कार)
8. **उत्कृष्ट कृत्रिम रेतन प्रशिक्षण केंद्र:** प्रात्यक्षिक प्रशिक्षण सुविधा, ॲनिमल शेड, लॅबोरेटरी/क्लास रूम सुविधा व उपस्थिती. (प्रथम, द्वितीय, तृतीय - 3 पुरस्कार)

### निवड प्रक्रिया व अर्ज पद्धत:

- 1 एप्रिल 2026 ते 31 मार्च 2027 या कालावधीत झालेल्या कामकाजाची नोंद यासाठी गृहीत धरली जाईल.
- पशुसंवर्धन आयुक्तांच्या अध्यक्षतेखालील विशेष निवड समितीमार्फत MBBRA व NDLM पोर्टलवर नोंदवलेल्या ऑनलाईन डेटाच्या आधारे पारदर्शकपणे विजेत्यांची निवड केली जाईल.
- विजेत्यांना प्रथम, द्वितीय व तृतीय पारितोषिक व सन्मानपत्र देण्यात येईल.
- राज्याचे मा. मंत्री पशुसंवर्धन व मा. सचिव यांच्या शुभहस्ते एका भव्य विशेष समारंभात या पुरस्कारांचे वितरण करण्यात येईल.

# पशुसंवर्धन विभागाच्या अधिकाऱ्यांकडून करंजाडी येथे पाहणी व मार्गदर्शन

**महाड (रायगड) :** प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त (मुंबई विभाग) डॉ. बाबुराव नरवडे व सहआयुक्त (गुणनियंत्रण, आयुक्तालय, पुणे) डॉ. प्रशांत कांबळे यांनी करंजाडी (ता. महाड, जि. रायगड) येथील शेतकऱ्यांच्या गोठ्यांना दि. 26 ऑगस्ट 2026 रोजी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली.

या भेटीदरम्यान अधिकाऱ्यांनी परिसरात सुरू असलेल्या लाळ खुरकूत व लंपी आजाराच्या प्रतिबंधक लसीकरण मोहिमे-9 चा आढावा घेतला. तसेच उपस्थित शेतकऱ्यांना जंत निर्मूलन, मिनरल मिक्स्चरचा योग्य वापर व लसीकरणाबाबत घ्यावयाच्या दक्षतेविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. सह्याद्रीच्या दुर्गम पर्वतरांगांमध्ये पशुपालन करताना येणाऱ्या विविध अडचणी जाणून घेत, अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांना गांडूळ खत, मुरघास योजना व टी.एम.आर. (TMR) योजना राबवण्यासाठी विशेष प्रोत्साहित केले. तसेच मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेविषयी माहिती दिली. या पाहणी दौऱ्यावेळी डॉ. अजय कांबळे (सहाय्यक आयुक्त, जिल्हा पशुवैद्यकीय चिकित्सालय अलिबाग), डॉ. सुभाष दळवी (सहाय्यक आयुक्त, महाड), ऋषिकेश चव्हाण (पशुधन पर्यवेक्षक, विन्हेरे) व शिवराम दर्शने (पशुधन पर्यवेक्षक, रावढळ) हे प्रमुख अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.


सह्याद्री अमृत शेतकरी उत्पादक कंपनी, दूध संकलन केंद्र



# सोलापूर: 'लाळखुरकत' लसीकरण फेरी- 9 चा आढावा








जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय कार्यालय, सोलापूर यांच्या वतीने जिल्ह्यातील सर्व तालुका पशुसंवर्धन अधिकाऱ्यांची व्हीसी (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग) द्वारे आढावा बैठक डॉ. नाना सोनवणे (सहआयुक्त, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, रोग अन्वेषण प्रयोगशाळा, पुणे) यांच्या अध्यक्षतेखाली आणि डॉ. अनिल तांबे (जिल्हा उपआयुक्त, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, सोलापूर) यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. यावेळी जिल्ह्यातील सर्व तालुका प्रमुख व संबंधित विषयाचे अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत लसीकरण फेरी 9 ची उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी आवश्यक ती सर्व खबरदारी व नियोजन करावे, आंतरराज्य आणि आंतरजिल्हा सीमा लागून असलेल्या तालुक्यांतील पशुवैद्यकीय पथकांनी विशेष सतर्क राहावे, शीतगृहातील (फ्रिजमधील) सर्व उपलब्ध लसींचा पूर्ण वापर होईल, या दृष्टीने सुयोग्य नियोजन करावे, ज्या तालुक्यांमध्ये जनावरांचे मोठे बाजार भरतात, तेथे विशेष डॉक्टरांची नियुक्ती करून तांत्रिक सेवा पुरवाव्यात तसेच एफएमडी (FMD) लसीकरण फेरीचा व्यापक प्रचार व प्रसिद्धी करावी, सर्व तालुका पशुसंवर्धन अधिकाऱ्यांनी दररोज व्हिडिओ कॉलद्वारे आपल्या अधिनस्त संस्थांच्या कामकाजाचा सक्तीने आढावा घ्यावा आदी सूचना करण्यात आल्या.

# जलालखेडा येथे 50 पशुपालकांना 3000 चारा ठोंबांचे वाटप





**जलालखेडा (नागपूर):** अल नीनोच्या पार्श्वभूमीवर जनावरांना बारमाही हिरवा चारा उपलब्ध व्हावा आणि दुग्धोत्पादनात वाढ व्हावी, या उद्देशाने पशुवैद्यकीय दवाखाना, जलालखेडा येथे विकसित केलेल्या चारा बागेतून 3000 चारा थोंबांचे वाटप 50 पशुपालकांना करण्यात आले. जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय डॉ. नितीन फुके यांच्या सूचनेनुसार, नरखेड तालुक्यातील जलालखेडा येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात अनिल इंगोले यांनी उन्हाळ्यात ही चारा बाग तयार केली होती. या बागेत उत्पादित BHN-10, BHN-6 आणि 'ऑस्ट्रेलियन रेड नेपिअर' या बहुवार्षिक जातींच्या 3000 ठोंबांचे वाटप नुकतेच पार पडले.

हा कार्यक्रम नरखेडचे पशुसंवर्धन सहायक आयुक्त डॉ. मुकिंदा जोगेकर यांच्या अध्यक्षतेखाली व कै. वसंतराव नाईक स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. याप्रसंगी जलालखेड्याचे सरपंच मयूर सोनोने, कुलदीप हिवरकर आणि प्रवीण लोहे यांची विशेष उपस्थिती होती. यावेळी ॲड. निलेश हेलोंडे यांनी उपलब्ध करून दिलेल्या 'स्पाइनलेस कॅक्टस' (काटेविरहित निवडुंग) व बहुवार्षिक हिरव्या चाऱ्याचे जनावरांच्या आहारातील महत्त्व डॉ. स्वप्नील रेवतकर, डॉ. राजेश भंदीरगे व डॉ. सुचिता उके या पशुवैद्यकांनी उपस्थितांना पटवून दिले. ॲड. निलेश हेलोंडे यांनी तालुक्यातील सर्व पशुपालकांनी अशा प्रकारच्या चारा लागवडीचा अवलंब करून दुग्ध उत्पादन वाढवावे, असे आवाहन केले आणि पशुपालकांना नेहमी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मतीन अली, अनिल इंगोले व इतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. उपस्थितांचे आभार डॉ. सुचिता उके यांनी मानले.

# बोराडी येथे शेळीपालन व संगोपन विषयक प्रशिक्षण



**बोराडी (ता. शिरपूर, जि. धुळे):** CINI संस्था व IVRI (इज्जतनगर, बरेली) यांच्या संयुक्त विद्यमाने बोराडी (ता. शिरपूर) येथे शेळीपालन, संगोपन व व्यवस्थापन या विषयावर आधारित विशेष प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. सहायक आयुक्त (शिरपूर) डॉ. कुलदीप भामरे व पविअ (जातोडा) डॉ. मिथुन पावरा, डॉ. अभिजित बावीस्कर, भीमराव मोरे, कुणाल पाटील व संदीप पाडवी यांनी शेळीपालकांशी संवाद साधून व्यवस्थापनाच्या विविध पैलूंवर सविस्तर माहिती दिली.

# धुळे जिल्ह्यातील एनएलएम प्रकल्पांना पशुसंवर्धन विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट





**साक्री (धुळे):** नाशिक विभागाचे प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त डॉ. प्रदीप झोड यांनी धुळे जिल्ह्यातील राष्ट्रीय पशुधन अभियान (NLM) अंतर्गत उभारण्यात आलेल्या माइल स्टोन-2 शेळी प्रकल्पांची प्रत्यक्ष पाहणी करून लाभार्थ्यांना मार्गदर्शन केले. या दौऱ्यादरम्यान त्यांनी साक्री तालुक्यातील म्हसदी येथील श्रीमती साधना अनिल देवरे यांच्या (100+5) शेळी पालनाचे युनिट तसेच बोडकी खडी येथील श्री. खंडू पोसलू कुवर यांच्या (500+25) भव्य शेळीपालन प्रकल्पाला भेट दिली. डॉ. झोड यांनी प्रकल्पातील व्यवस्थापन, चारा नियोजन, आरोग्य व शेळ्यांच्या पैदासीबाबत सविस्तर आढावा घेतला. तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेळीपालन व्यवसाय कसा फायदेशीर करावा, याबाबत दोन्ही लाभार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन व प्रोत्साहन दिले.

# सिंधुदुर्ग: पशुसंवर्धन विभागाच्या कामकाजाचा प्रादेशिक सहआयुक्तांकडून आढावा






मुंबई विभागाचे पशुसंवर्धन प्रादेशिक सहआयुक्त डॉ. बाबुराव नरवाडे यांनी सिंधुदुर्ग जिल्ह्याचा दोन दिवसीय दौरा करून विभागीय कामकाजाचा आणि विविध शासकीय योजनांचा सविस्तर आढावा घेतला. या दौऱ्यात डॉ. नरवाडे यांनी जिल्ह्यातील सर्व 3 एन.एल.एम. प्रकरणांची प्रत्यक्ष पाहणी केली. जिल्हा पशुवैद्यकीय चिकित्सालय, कणकवली तसेच माणगाव (ता. कुडाळ) येथील पशुवैद्यकीय चिकित्सालयाला भेट देऊन त्यांनी तपासणी केली. निळेली येथील पशुपैदास प्रक्षेत्रास भेट देऊन प्रस्तावित शासकीय हॅचरीच्या जागेची पाहणी केली. ऑनलाईन कृत्रिम रेतन, गर्भतपासणी, आणि वासरू नोंदणी या प्रलंबित नोंदी पूर्ण करण्याचे निर्देश दिले. सोबतच लम्पी व लाळ्या खुरकूत लसीकरण, मान्सूनपूर्व लसीकरण, गोशाळा योजना, मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना व विविध नाविन्यपूर्ण योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला. जिल्ह्याचे प्रतिदिन प्रती दवाखाना कृत्रिम रेतनाचे प्रमाण वाढवण्यासाठी ठोस कृती आराखडा राबवण्याचे मार्गदर्शन केले. आगामी काळात प्राप्त होणाऱ्या 'ब्रुसेलोसिस' लसीकरणाचे नियोजनबद्ध वितरण व अंमलबजावणी करण्याच्या सूचना दिल्या



**प्रकाशक:** पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य

# अलिबागमध्ये शेळीवर यशस्वी सिझेरियन शस्त्रक्रिया





अलिबाग, रायगड: पशुवैद्यकीय चिकित्सालय, चौल अंतर्गत श्री. घरत यांच्या शेळीवर जिल्हा पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालय, अलिबाग येथे अत्यंत जटिल असलेली सिझेरियन शस्त्रक्रिया यशस्वीपणे करण्यात आली. पिल्लू बाहेर न येऊ शकल्याने पशुपालक चिंतेत होते. स्थानिक पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. सविता राठोड यांनी सदर शेळीवर प्राथमिक तपासणी केली, परंतु सदर शेळीची नैसर्गिक प्रसूती होणे शक्य नव्हती म्हणून त्यांनी सदरची केस जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय अलिबाग येथे पुढील संदर्भासाठी पाठवली.

दि. 4 सप्टेंबर रोजी सायंकाळी 4.30 वा. शेळीला जिल्हा पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालय, अलिबाग येथे दाखल करण्यात आले. जटिल प्रसूती असल्याचे निदान झाले व तातडीने सिझेरियन शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेण्यात आला. सदर शेळीच्या शस्त्रक्रियामध्ये प्रमुख शल्यविशारद म्हणून डॉ. राजेश लाळगे, पशुवैद्यकीय अधिकारी (पेण) यांनी कामकाज पाहिले. त्यांना डॉ. सोमनाथ भोजने (झिराड) व डॉ. सविता राठोड (चौल) यांनी मोलाचे सहकार्य केले. सदरची शस्त्रक्रिया डॉ. अजय कांबळे सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन जिल्हा पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालय अलिबाग यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करण्यात आली. शस्त्रक्रियेदरम्यान शेळीच्या पोटातून मृत ममीफाईड गर्भ (Mummified Fetus) यशस्वीरित्या बाहेर काढण्यात आला. या शस्त्रक्रियेचे वैशिष्ट्य म्हणजे शस्त्रक्रियेनंतर केवळ 15 मिनिटांतच शेळी स्वतःच्या पायावर उभी राहिली व चालू लागली. पशुपालक श्री. घरत यांनी समाधान व्यक्त करून पशुवैद्यकीय पथकाचे आभार मानले आहेत. शेळीवर पुढील आठवडाभर औषधोपचार सुरू ठेवणार असल्याचे पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी सांगितले.



## गडचिरोलीत पशुपालनाला चालना

गडचिरोली: पशुसंवर्धन विभागाच्या वतीने गडचिरोली येथे आयोजित जिल्हास्तरीय एक दिवशीय कार्यशाळा व पंच संमेलनाप्रसंगी उपस्थित पशुपालक, शेतकरी व लोकप्रतिनिधी. या कार्यशाळेत 'पशुधन विमा योजना', 'पशुसंवर्धन किसान क्रेडिट कार्ड (KCC)' आणि 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना' यांसारख्या विविध कल्याणकारी योजनांची सविस्तर माहिती देण्यात आली.

# सुकळी: 'एक दिवसीय पशुधन व्यवसाय विषयक महिलांची कार्यशाळा'



येळाबारा (यवतमाळ): विकासगंगा समाजसेवी संस्था व अझीम प्रेमजी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच पशुसंवर्धन विभाग, यवतमाळ यांच्या सहकार्याने पशु चिकित्सालय, येळाबारा अंतर्गत येणाऱ्या सुकळी गावी 'एक दिवसीय महिला पशुधन कार्यशाळेचे' यशस्वी आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेस सुकळी, धानोरा, मुरझडी, गणेशपूर, झुली व चौकी या आसपासच्या सहा गावांतील तब्बल 168 महिला शेळीपालक व महिला उद्योजक उपस्थित होत्या. या माध्यमातून महिलांना शेळीपालन, पशुआरोग्य, वेळेवर लसीकरण, प्रजनन व्यवस्थापन तसेच पशुसंवर्धन विभागाच्या विविध शासकीय योजनांबाबत तज्ज्ञांकडून अत्यंत उपयुक्त व तांत्रिक मार्गदर्शन मिळाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विकासगंगा समाजसेवी संस्थेचे अध्यक्ष श्री. रंजीत बोबडे हे होते. तर कार्यशाळेत डॉ. रानु कडू, डॉ. शशांक दुधे, श्री. मिलिंद शंभरकर, श्री. दिनेश विडूळकर व श्री. अनिल बेंद्रे यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहून महिलांना पशुपालनातील बारकावे व व्यवसायवृद्धीचे धडे दिले. कार्यशाळेमुळे परिसरातील महिला शेळीपालकांमध्ये नवा उत्साह पाहायला मिळाला.

# सुधारित गोवर्धन गोवंश सेवा केंद्र योजनेअंतर्गत गोवंश निवारा व चारा गोडाऊनचे लोकार्पण

पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र गोसेवा आयोग यांच्या सुधारित गोवर्धन गोवंश सेवा केंद्र योजनेअंतर्गत श्रीकृष्ण गोशाळा, पोखरभोसी, ता. लोहा, जि. नांदेड येथे उभारण्यात आलेल्या गोवंश निवारा (शेड) व चारा गोडाऊनचे लोकार्पण तसेच गोशाळेचा 16 वा वर्धापन दिन सोहळा दि. 06 सप्टेंबर 2026 रोजी आयोजित करण्यात आला होता. या निमित्ताने डॉ. सखाराम खुणे, जिल्हा उपआयुक्त, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, नांदेड; सुनील सूर्यवंशी, सदस्य, महाराष्ट्र गोसेवा आयोग; डॉ. प्रविणकुमार घुले, सहाय्यक आयुक्त, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, नांदेड; डॉ. अरविंद गायकवाड, सहाय्यक आयुक्त, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय, नांदेड तसेच डॉ. दीप्ती चव्हाण, पशुवैद्यकीय अधिकारी, पशुवैद्यकीय चिकित्सालय (स्थानिक), कलंबर, ता. लोहा यांनी गोशाळेस भेट दिली. गोवंशाच्या आरोग्याची नियमित तपासणी, संतुलित आहार व चारा व्यवस्थापन, स्वच्छता, जैवसुरक्षा तसेच गोशाळेचे शास्त्रीय व सुयोग्य व्यवस्थापन याबाबत संबंधितांना आवश्यक तांत्रिक मार्गदर्शन करण्यात आले.











राष्ट्रीय पशु रोग नियंत्रण कार्यक्रम (NADCP) लाळ खुरकूत रोग (FMD) लसीकरण मोहीम (फेरी-९वी) संनियंत्रण, संनिरीक्षण व सेरो-मॉनिटरिंग प्रसंगी डॉ. नाना सोनवणे (सहआयुक्त पशुसंवर्धन, रोग अन्वेषण विभाग) डॉ. अनिल देशपांडे (उपआयुक्त) डॉ. सुनील लहाने (उपआयुक्त) डॉ. वैशाली वानखेडे (सहा. आयुक्त) डॉ. चारुशिला राऊत व डॉ. नम्रता चौधरी (पशुवैद्यकीय अधिकारी) आदी.

# पशुसंवर्धनविषयक प्रशिक्षणाचा परिणाम, ग्रामस्थ बनताहेत उद्योजक







**नागपूर:** विशेष घटक योजनेअंतर्गत कुही पंचायत समिती... 14 डिसेंबर 2024 दरम्यान आयोजित तीन दिवसीय पशुपालन प्रशिक्षणाची फलश्रुती ग्रामीण भागात दिसून येत आहे. या प्रशिक्षणामध्ये दुग्धपालन, शेळीपालन व कुक्कुटपालनाविषयी आधुनिक व्यवस्थापन, रोग नियंत्रण व बाजारपेठेतील संधींबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले. यातून प्रेरणा घेऊन कुही येथील सौ. गिरिजा वामन सोमकुवर यांनी 8 हजार पक्ष्यांसह कुक्कुटपालनाला सुरुवात केली असून, सध्या 1 कोटी रुपये खर्चून अत्याधुनिक शेड उभारले आहे. शासकीय योजना व योग्य प्रशिक्षणाच्या बळावर त्या ग्रामीण भागातील इतर शेतकरी व महिलांसाठी प्रेरणास्रोत ठरल्या आहेत.

या उपक्रमाच्या यशामागे पशुधन विकास अधिकारी डॉ. अविरत सवाईमूल व डॉ. वैशाली अंजनकर यांच्यासह पशुधन पर्यवेक्षक श्री. पराग खोब्रागडे, श्री. बावणे, श्री. रूपेश खोडणकर, श्री. गोपाल फड, श्री. राहुल बंधाते आणि संपूर्ण कर्मचारी वृंदाचे विशेष योगदान लाभले. त्यांच्या प्रभावी नियोजन व मार्गदर्शनामुळे लाभार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला आहे. विशेष घटक योजनेच्या अशा उपक्रमांमुळे ग्रामीण नागरिकांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होत असून, पशुपालनाच्या माध्यमातून आर्थिक सक्षमीकरणाला मोठी चालना मिळत आहे.

महाराष्ट्र शासन
पशुसंवर्धन विभाग

# सुलभ प्रसुतीची बाराखडी

सुरक्षित प्रसुती
समृद्ध भविष्य



निरोगी जनावरे | सुरक्षित प्रसुती | समृद्ध पशुपालक

| | |
|---|---|
| अ | अनेक प्रसूती सुलभच, मात्र घडू शकते कष्टप्रसूती |
| आ | आरोग्य असता सुद्रढ, प्रसुतीनंतर झीज होते कमी |
| इ | इजा, वेदना, ताण, दु:ख सुलभ प्रसुतीत सुद्धा शक्य |
| ई | ई-कोलाय जिवाणू, प्रसुतीनंतर घडवतात कासदाह |
| उ | उगी नकोच हाताळणी, प्रसुती सुलभ घडताना |
| ऊ | ऊर्जातून सहज वाढवता येते प्रसुती कळांची क्षमता |
| ए | एका व्यक्तीचा वासरू ओढताना, दाब असतो ७५ किलो |
| ऐ | ऐका विचार नीट, 'कोरडा गोठा मोजा नोटा' |
| ओ | ओढ चूक दिल्यास, जन्मणाऱ्या वासराचे डोके फिरते |
| औ | औषधोपचारशिवाय प्रसुती नेहमी अपूर्णच असते |
| अं | अंधश्रद्धा सोडा, पशु प्रसुती अजिबात हाताळू नका |
| अ: | अ:, व्याली.....होsss, हाच क्षण आनंदाचा! |
| क | कटी पोकळीची जागा, प्रसुती वेळी प्रसरण पावते |
| ख | खरोखर आश्चर्य घडते, सुलभ प्रसुतीच्या शरीरक्रियेने |
| ग | गतिमान शरीर वजन वाढ, हेच प्रसुती पश्चात लक्ष्य |
| घ | घट्ट पांढरा योनीस्त्राव, हीच प्रसुतीची सुरुवात |
| च | चला, प्रसुतीनंतर दूधच्या नियमित नोंदी करू या |
| छ | छळू नका वासरांना, गळ्यात दोरी बांधून |
| ज | जरासा गरजेपेक्षा अधिक खुराक, फायदा भरमसाठ |
| झ | झळ अडकलेल्या वाराची, होळीच दूध उत्पादनाची |
| ट | टळेल प्रतिबंधात्मक औषधोपचाराने प्रसुतीपश्चात ताण |
| ठ | ठरवा गोठ्यात प्रसुती प्रमाण, वर्षास १०% पेक्षा जास्त |
| ड | डमी वासरू, ऑक्सिटोसिन यांना वगळा पशुपालनात |
| ढ | ढकलू नका वासराचे पाय, डोके गर्भाशयात |
| ण | पण प्रसुतीची तारीख ठरते, नेहमी वासराकडूनच |
| त | तयार ठेवा गोठ्यात 'पशुप्रसुती किट' नेहमी |
| थ | थकवा असतोच प्रसुतीनंतर, म्हणून उपचार गरजेचे |
| द | दररोज हवे स्वच्छता व निर्जंतुकीकरण प्रसुतीपश्चात |
| ध | धरून ओढू नका वार/जार, नेहमी धोका वाढवणारा |
| न | नजरेसमोर असावीत प्रसुत होणारी जनावरे |
| प | पहिली गर्भजल पिशवी मुतरण, दुसरी पिशवी भाट्टंडा |
| फ | फक्त अर्ध्या तासात नवजात वासरांना पाजा चीक |
| फ | बनवा खत वाराच्या उपयोगातून, सेंद्रिय कर्ब वाढण्यास |
| भ | भरवा पशुखाद्य, घुगऱ्या, गुळ प्रसुतीनंतर जनावरांना |
| म | मऊ असावी जमीन, जनावरांची प्रसुती घडताना |
| य | यशस्वी होते कष्टप्रसुती सुटका, तज्ञ पशुवैद्यकाकडूनच |
| र | रवंथ थांबते, उठ बैस वाढते प्रसुती कळांमुळेच |
| ल | लगेच नोंद करा, नवजात वासराचे वजन, लिंग, तारीख |
| व | वरतूनच पाजा बाटलीद्वारे नवजात वासरांना चीक |
| श | शक्यता भांडे पडण्याची, नेहमी टाळा चुंबळ बांधून |
| ष | षटक संक्रमण काळाचे, सुलभ प्रसुतीसाठी दक्षतेचे |
| स | सगळा गर्भाशय पीळ, सोडवता येतो पशुवैद्यकाला |
| ह | हळू ढिले केले जातात, पशुवैद्याकडून वाराचे जोड |
| ळ | कळा सुरू असतात प्रसुतीनंतर, गर्भाशय स्वच्छतेसाठी |
| क्ष | क्षणभर विश्रांती घेतात जनावरे वासरू जन्मताना |
| त्र | त्रस्त, विचलित, अधिर पशुपालकाची मानसिकता चूकच |
| ज्ञ | ज्ञात पशुवैद्यकीय यंत्रणेचे संपर्क, लिहून ठेवा गोठ्यात |
| श्र | श्रम नव्हे कौशल्य, उपयोगी कष्ट प्रसुती सोडवण्यास |
| ऋ | ऋण माना पशुधनाचे, पाऊल टाका प्रगतीचे! |



निरोगी माता...
समृद्ध वासरे...
संपन्न महाराष्ट्र...

जागरूकता | संवेदनशीलता | समृद्धी

रचना: डॉ. नितीन मार्कंडेय, माजी सहयोगी अधिष्ठाता
व प्राध्यापक, पशुवैद्यकीय महाविद्यालय, परभणी

| महाराष्ट्र शासन, पशुसंवर्धन विभाग

महाराष्ट्र शासन
पशुसंवर्धन विभाग

समृद्ध पशुधन
सशक्त शेतकरी
समृद्ध महाराष्ट्र

# पशुधन समृद्धी
# चारा समृद्धी
# ग्रामीण विकास

निरोगी पशुधन
समृद्ध शेतकरी
विकसित महाराष्ट्र

सशक्त पशुधन | सकस चारा | समृद्ध पशुपालक | साधनसंपन्न ग्राम

महाराष्ट्र शासन पशुसंवर्धन विभाग
पशुधन हिताय: बहुजन सुखाय:



## पशुधन समृद्धी

- उच्च वंशावळीचे पशुधन
- दूध, मांस, अंडी व पुरक उत्पादने
- पशु आरोग्य व जैवसुरक्षा
- पशुधन उत्पादकांचे उत्पन्न वाढ

## चारा समृद्धी

- हिरवा व सुका चारा उपलब्धता
- उत्पादन व उत्पादकता वाढ
- वैज्ञानिक चारा शेती व तंत्रज्ञान
- चारा साठवण व प्रक्रिया
- चारा नियोजन व संवर्धन

## ग्रामीण विकास

- शेतकरी उत्पन्नवाढ
- रोजगार निर्मिती
- महिला व युवकांचे सशक्तीकरण
- स्वयंपूर्ण व समृद्ध गावे
- शाश्वत व सर्वसमावेशक विकास

तंत्रज्ञान | प्रशिक्षण | आर्थिक सहाय्य | बाजारपेठ | स्वयंपूर्णता | शाश्वत विकास

**पशुसंवर्धन विभाग,**
**महाराष्ट्र राज्य**

**महापशुधन वार्ता**